# भावकवी तुकाराम

डॉ. स. ग. यादव
प्राचार्य टी. ए. गवळी

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३२०५



REFBK-0025772

संदर्भ - चारित्र निबंध

३२९५
२५७७२
२७।१२।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 JAN 1989

15 FEB 1989

(क्र. मा. पद्दा)
५०००–११–८६

# भावकवी तुकाराम

डॉ. स. ग. यादव
प्राचार्य टी. ए. गवळी

REFBK-0025772

प्रचार प्रकाशन, कोल्हापूर-४१६ ००८

भावकवी तुकाराम | Bhavakavi Tukaram

डॉ. स. ग. यादव | Dr. S. G. Yadav
प्राचार्य टी. ए. गवळी | Principal T. A. Gavali

प्रकाशन क्रमांक / ८४ | प्रथम आवृत्ती / ऑगस्ट १९८८

प्रकाशक /
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब, प्लॉट नं. ४ अ,
नलवडे कॉलनी–सम्राटनगर
सागरमाळ, कोल्हापूर–४१६ ००८

मुद्रक
श्रीपाद सीताराम गोसावी
राजहंस प्रिंटिंग प्रेस
नागाळा पार्क, कोल्हापूर. ४१६ ००३
फोन नं २३९०६

मूल्य रुपये २०/-

© डॉ. स. ग. यादव
स्नेहसागर, ई, कसबा बावडा,
कोल्हापूर– ४१६ ००६

मुखपृष्ठ / विनय मराठे | ब्लॉक / उदय प्रोसेस

– प्रमुख वितरक –
मे. सिद्धार्थ बुक सेंटर
२०, प्रतिभानगर मार्केट
सागरमाळ, कोल्हापूर– ४१६ ००८

डॉ. बापूजी साळुंखें-

आपल्या आदरणीय स्मृतीस-

– लेखक

* भावकवी तुकाराम
* शिवाजी विद्यापीठ--
एका लेखकाचा अभ्यास यासाठी उपयुक्त

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
३२९५
२१५७८२
२०।९।९८

# प्रकरण : एक

## प्रास्ताविक

कोणताही कायदा एखादे शासन अगर एखादी व्यक्ती करू शकत नाही. हवी तर नियमांची चौकट त्यास तयार करता येईल. लोकांचे सर्व अर्थाने कल्याण होईल असा कायदा करू शकत नाही. माणूस हा यंत्र नसून तो एक भाव–भावनांचा चालता–बोलता पुतळा आहे. तो मांसाचा निव्वळ गोळा नाही,तर त्याला चालायला पाय आहेत. काम करायला हात आहेत. चांगल्या पदार्थांचा आस्वाद घ्यायला, बोलायला तोंड आहे. चांगले दृश्य निरखण्यासाठी डोळे आहेत. खांद्यावर मस्तक आहे आणि इतर प्राण्यापेक्षा वेगळे म्हणजे त्या मस्तकांत चांगला–वाईट विचार करायला ' मेंदू ' आहे. त्यामुळेच कोणत्याही सत्तेचे नियम त्यास मान्य होतील असे नाही.

जे सिंहासन कायदा करते पण त्याचा अंमल करायला असमर्थ ठरते. त्या ठिकाणी साधुसंताची वाणी मौलिक कार्य करत असते. संताच्या वाणीचा एखादाच हुंकार व्यापारपेठेचे तीर्थक्षेत्र करू शकतो, तर आंधळ्यास दिव्यदृष्टी देवू शकतो. यादृष्टीने आमच्या साधुसंताचे वाङ्मय हे मौलिक कार्य आहे. तो एक मोलाचा खजिना आहे. अपूर्व देणगी आहे. म्हणूनच म्हटले जाते,

' संत चरित्रे, परमपवित्रें आवडी गाईन ! '

दिवसेंदिवस मानवाचे यंत्र बनत चालले आहे. माणुसकी लुप्तावत आहे. तो स्वतःचा विचार करत नाही. स्वतःचाही नाही व शेजाऱ्याचा तर मुळीच नाही. त्याने भौतिक प्रगती केली. चंद्राची माती आणली. त्या मातीचे निरीक्षण परीक्षण तो करू लागला. नाभीकमळात जन्मतः येणारी माती–बंद मुठीतली माती त्याच्या दृष्टीआड झाली. मंगळावर वस्ती करण्याचा विचार करू लागला.

पण इथे वाढणाऱ्या वस्त्या त्याकडे त्याचे डोळे फिरेनासे झाले. अंधाऱ्या खोलीत नसणाऱ्या माणसांचा शोध तो घेवू लागला. त्यामुळे आमचे साधुसंत आणि त्यांचे वाङ्मय त्यास अवघड वाटू लागले. ' अमृतघट भरले तुझ्या घरी–परी वणवण फिरशी बाजारी ' अशी त्याची अवस्था झाली. टी. व्ही. वरला राम बरा वाटू लागला. आत्माराम समजेनासा झाला. यासाठी या देशाची एक स्वतंत्र भव्यदीव्य संस्कृती आहे. हे त्यास समजून द्यावे लागणार आहे. या काव्यात्म युद्धाचा तोच एक प्रधान हेतू आहे.

संत साहित्यातील एक दिव्य साक्षात्कार म्हणजे तुकाराम ! वारकरी संप्रदायाचा कळस ! ज्याच्या ग्रंथांचे ( गाथेची ) इंग्रजी भाषांतर होणे धन्यतेचे मानले जावू लागले. जो तुकाराम–घराघरात–चुलीजवळ होता तो तुकाराम बर्शेन आल्यावर बाहेर पडला. देवासमोर जळणारा तेलाचा दिवा गेला आणि झिरोचा बल्ब आला. तुळशी वृंदावन गेले– सडा रांगोळी गेली आणि फरशी बसली.

हा नवा बदल आहे. माणसाचे पाय प्लॅस्टिकचे झाले आहेत. ते मातीचे उरले नाहीत. म्हणूनच साधू-संत दूरावल्यासारखे वाटू लागलेत.

या मराठी भाषेतल्या भावकविचे–त्याच्या अभंगाचे एक नवे दर्शन–चिकित्सक वृत्तीने या ग्रंथात करण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
नोंदणी ३२६५
२५७७२
२०/१/८८
संदर्भ शाखा

## प्रकरण : दोन

### वारकरी संप्रदाय–परंपरा

भारतातील अनेक संप्रदायपैकी पुरातन आणि प्रमुख संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय होय. आज याच संप्रदायाचे भक्त आपल्या देशातच नव्हे तर परदेशातसुद्धा आढळतात. या संप्रदायाचे प्रमुख दैवत श्री विठ्ठल होय. यालाच पांडूरंग असे म्हणतात. या संप्रदायाची परंपरा पुरातन काळापासून चालत आलेली आहे. यालाच भागवतधर्म असेही म्हणतात.

### संप्रदायाचे नाव

वारकरी, माळकरी, टाळकरी तसेच भागवतसंप्रदाय अशी या संप्रदायाची नावे आपल्याला आढळतात. परंतु प्रचलित नाव म्हणजे वारकरी संप्रदाय होय.

वारकरी या शब्दाची उत्पती ' वारी करी तो वारकरी ' अशी आपल्याला दाखवता येईल. वारी या शब्दाचे अर्थ आपल्याला पुढीलप्रमाणे आढळतात. वारी म्हणजे प्रवाशांची टोळी अशी उत्पती कै. राजवाडे यांनी दिली आहे. वारकरी म्हणजे वारीला जाणारा प्रवासी असा त्याचा अर्थ होतो.

अमरकोषात ' वारी ' या शब्दाचा अर्थ ' समुदाय ' असा दिलेला आहे; तरीही पंढरपूरपर्यंत अनेक खेपा करणारा त्यालाच वारकरी असे म्हणतात. आषाढ, कार्तिक, माघ किंवा चैत्र यापैकी एका महिन्यात पंढरपूरला जाणारा म्हणजे ' वारी करणारा ' तो वारकरी होय.

### संप्रदायाचे आराध्य दैवत

आपल्या देशात इतरही संप्रदाय किंवा पंथ आहेत. हे सर्व पंथ एकाच देवतेची उपासना करतात असे आपल्याला आढळून येईल व हे दैवत म्हणजे विठ्ठल

किंवा पांडूरंग होय. १) पांडूरंग हा शब्द पांढरे अंग असा बनवलेला आहे. २) उत्तर भारतात ' गौरांग ' संप्रदाय आहे. तो शब्द गोरे अंग असा तयार झाला आहे. म्हणजेच पांढरे अंग आणि गोरे अंग यात फरक नाही. ३) गुजराती माणूस द्वारकानाथाची भक्ति करतो. द्वारकानाथ म्हणजे श्रीकृष्ण होय. त्यालाच डाकोरनाथ असे प्रचलीत नाव आहे. ४) दक्षिण प्रांतात ' बालाजी ' या देवतेची भक्ति केली जाते. तेव्हा बालाजी या शब्दाचा अर्थ ' चिमुकला श्रीकृष्ण ' असे आपल्याला म्हणता येईल. काही विद्वान तो विष्णूचा अवतार असे मानतात.

पांडूरंगाची पत्नी रुक्मिणी होय. हा शब्द राधा–राही व रुक्मिणी असा तयार झाला; म्हणजेच विठ्ठल हे श्रीकृष्णाचेच रुप आहे. अलीकडे काही विद्वान ' ख्रित ' हा शब्द कृष्ण या शब्दाचा अपभ्रंश आहे असे मानतात. तात्पर्याने हे मत मान्य होणारे नसले तरीही सर्वच श्रीकृष्णाची वेगवेगळ्या रूपात भक्ती करत असतात असे आपल्याला म्हणता येईल.

## वारकरी संप्रदायाची तीर्थक्षेत्रे

वारकरी संप्रदायातील थोर साधूसंतांनी ज्या ज्या ठिकाणी वास्तव्य केले किंवा त्यांचा जन्म झाला त्यालाच वारकरी संप्रदायाचे तीर्थक्षेत्र असे म्हणतात. पुंडलिकामुळे पंढरपूर, तुकारामाचे देहू, ज्ञानदेवाचे आळंदी, पैठण, नेवासे, त्र्यबंकेश्वर, पिंपळनेर, सासवड, अरण, मंगळवेढे ही वारकऱ्यांची पवित्र ठिकाणे आहेत. तीर्थस्थान जन्मस्थान कर्मस्थान किंवा समाधिस्थान या स्वरूपात ती आपल्याला आढळतात.

## वारकरी संप्रदायात प्रवेश

या संप्रदायात प्रवेश मिळणे फारसे कठीणही नाही व फारसे अवघडही नाही. आचारधर्म आणि विचारप्रणाली याप्रमाणे प्रवेश करणाऱ्याला तुळशीची माळ गळ्यात घातली जाते. कोणती वारी करणार? असा प्रश्न विचारला जातो व टाळचांच्या गजरात पंथात प्रवेश होतो.

प्रवेश केल्यानंतर मात्र त्याच्यावर बंधने येतात. अभक्ष्य भक्षण करू नये, वर्षातून एखादी तरी वारी करावी, परस्त्री मातेसमान मानावी, सकाळी उठल्या बरोबर आंघोळ करून हरीपाठाचे अभंग म्हणावेत, मन प्रसन्न ठेवून दिवसभर आपण जी जी कामे करतो ती सर्व पांडूरंगाच्या प्रेरणेतून करतो असे आचरण ठेवावे म्हणजे तो वारकरी झाला. असे मानण्यात येते.

## भक्त पुंडलिक

सामान्यत: ज्ञानदेवापासून वारकरी संप्रदायाची परंपरा मानतात. वारकरी संप्रदायाचे जनक ज्ञानदेव नसून त्याची पुनर्स्थापना ज्ञानदेवानी केलेली आहे. या

पंथाची परंपरा ज्ञानदेवांच्यापूर्वी खूप वर्षे महाराष्ट्रात प्रचलीत होती. भक्त पुंडलीक हा पहिला या पंथाचा प्रवर्तक मानण्यात येतो. त्यामुळेच 'पुंडलीक वरदे' असा जयजकार मराठी संप्रदायात आला.

' पद्मपुराण ' या ग्रंथात भक्त पुंडलीकाची कथा आपल्याला सापडते. या कथेत भक्त पुंडलिक हा स्त्रीलंपट होता. आपल्या आई–वडीलांची त्याने अवहेलना केली. त्यांच्या गळचाला फास लावून त्याची कावड तयार केली व बायकोला खांद्यावर घेऊन तो चालू लागला. अशावेळी त्याला कुक्कुटस्वामी भेटले. त्यांनी त्याची निर्भत्सना केली. पुंडलिकाला पश्चाताप झाला व त्या दिवसापासून तो मातृभक्त बनला. आईवडीलांची सेवा करत असताना त्याची मातृपितृ भक्ती पाहून प्रत्यक्ष विठ्ठल–रुक्मिणी त्याला भेटावयास आले. तो सेवेत मग्न होता. तेव्हा त्याने वीट फेकली आणि मी जोपर्यंत मागे वळून पाहत नाही तोपर्यंत तेथून हालू नकोस असा विठ्ठलाला दम भरला. म्हणूनच ' पुंडरीकपूर ' या नावावरून ' पंढरपूर ' असे नाव पडले.

## ज्ञानदेवे रचिले पाया

भक्त पुंडलिकानंतर काही दिवस वारकरी संप्रदायास मरगळ आलेली होती. ती मरगळ ज्ञानेश्वरांनी दूर केली. म्हणूनच–

' ज्ञानदेवे रचिले पाया । उभारले देवालया
नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार
संत एकनाथ । ध्वज उभारी भागवत
भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ।

– अशी वारकरी संप्रदायाची परंपरा मानली जाते.

ज्ञानेश्वरांचा जन्म आपेगाव की आळंदी याठिकाणी झाला असा वाद असला तरी त्यांचा जन्म आळंदीसच झाला असे दांडेकरांनी सांगितलेले आहे.

प्रस्तुत ग्रंथात ज्ञानदेवांचे संपूर्ण चरित्र महत्त्वाचे नाही. अभ्यासकांना ते अन्यत्र उपलब्ध होईल. तरीही त्यांची दिलेली नावे किंवा असणारी नावे पाहिल्यानंतर आपल्याला नवीन विचार करावा लागतो.

ज्ञानदेवांचे गुरु म्हणजेच त्यांचे थोरले बंधू निवृत्तीनाथ होत. ज्ञानदेवांनी त्यांच्यापासून दीक्षा घेतली. या चारी भावंडाच्या नावातच त्यांची वृत्ती व आचारधर्म सामावलेला आहे. तो पुढीलप्रमाणे आपल्याला सांगता येईल.

प्रथम संसारातून निवृत्ती पत्करा, ज्ञानाचा सोपान म्हणजे पायरी चढा, म्हणजे मुक्ती मिळेल. असा या चार भावडांच्या नावाचा अर्थ आपल्याला सांगता येईल.

ज्ञानदेव हे चक्रधरानंतरचे दुसरे बंडखोर कवी होत. यांनी संस्कृत भाषेत असणाऱ्या गीता ' या मूळ ग्रंथाचा अर्थ ज्ञानेश्वरीत अडाणी लोकांना समजून सांगितला. ज्ञानेश्वरीबरोबरच ज्ञानेश्वरांच्या नावावर 'अमृतानुभव', चांगदेव पासष्टी आणि 'अभंग गाथा' या चार प्रमुख रचना मोडतात. या बरोबरच योगवसिष्ठ, आत्मानुभव इ. पंचवीस ग्रंथांचे कर्तृत्व ज्ञानेश्वरांच्याकडे दिले जाते.

तात्पर्याने वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी महान रचना करणारा हा अलौकिक पुरुष होता. मराठी भाषेची थोरवी व जीवनाचे तत्त्वज्ञान त्यानी लोकांना समजून सांगितले.

## भक्त नामदेव

निवृत्तीनाथ,ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई यांच्याबरोबर वारकरी संप्रदायाचे प्रसारक नामदेव होत. नामदेवांची गुरु परंपरा विसोबा खेचरापासून सुरू होते व विसोबा खेचर निवृत्तीनाथाप्रमाणेच नाथसंप्रदायाचे होते.

महाराष्ट्र, कर्नाटक, पंजाब या परप्रांतात वारकरी संप्रदायाचा प्रसार भक्त नामदेवांनी केला. पंच्याऐंशी वर्षे आयुष्य लाभलेल्या या संताची भक्ति भोळीभाबडी होती.

## समकालीन संत

ज्ञानदेवांचा कालखंड हा रामदेवराय यादवांचा कालखंड मानला जातो. सुखी आणि संपन्न राजवट या काळात होती. सोन्याचा धूर याच काळात निघत होता. याच काळात मुक्ताबाई, जनाबाई, परिसा भागवत, बिसोबा खेचर, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, जोगा परमानंद, सेना न्हावी, कान्होपात्रा, चोखामेळा इत्यादी संत आपल्याला आढळतात.

हे सर्व संत विविध जातीचे आहेत. यातील प्रत्येकाचा व्यवसाय वेगवेगळा आहे. आणि म्हणूनच प्रत्येक संताने आपल्या व्यवसायातले शब्द आपल्या रचनेत वापरलेले आहेत. चोखा मेळा ' चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा ' असा स्वतःचा उल्लेख करतो. त्याचबरोबर नरहरी सोनार, सावता माळी, कान्होपात्रा यांच्या रचनेतून त्यांच्या भक्तिबरोबरच व्यवसायाची माहिती आपल्याला आढळते.

## संत एकनाथ । ध्वज उभारी भागवत

नामदेवांच्यानंतर भानुदासाचे पणतू एकनाथ यानी या संप्रदायाची परंपरा पुढे चालवली. त्याचा जन्म 'पैठण' याठिकाणी झाला. भक्तिबरोबरच सामान्य लोकांच्या भाषेत त्यांनी वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान सामान्य जनतेला समजावून दिले. संत एकनाथा पासून वारकरी संप्रदायास भागवतधर्म हे नाव अधिक रूढ झाले. आज फक्त महाराष्ट्र नव्हे तर आपल्या देशाच्या बाहेरही या संप्रदायाची

पताका फडकताना दिसते आहे. यंत्रयुगामुळे खेडी मोडली जावू लागली आहेत. रस्ते झाले, शाळा कॉलेजे झाली, नवा माणूस तयार होतो आहे. पण त्याच्या मनातला पांडुरंग अजून हरवलेला नाही. नवी पिढी तो हरवू पहाते आहे. या नव्या पिढीस आमच्या साधुसंताची नव्याने ओळख करून देणे आवश्यक आहे.

या वारकरी संप्रदायाचा कळस म्हणजे, संतश्रेष्ठ तुकाराम होय! जो कवी होता. त्यापूर्वी संत होता. व त्याही अगोदर एक गृहस्थ होता. एका संसारी माणसाने ध्यास घेतला तर त्याचा जीवन पट कसा बदलू शकतो याचे नमुनेदार उदाहरण म्हणजे संत तुकाराम होय !

ख्रिस्ती मिशनरी, मराठीतील टीकाकार यांनी या संतावर टीका केली आहे. ही टीका एकांगी स्वरूपांची आहे. त्यात जातीचा अभिमान आढळतो किंवा या थोर पुरुषांस न समजून घेणे आपणांस आढळते.

नव्या दृष्टीने, नव्या विचाराने या संतपुरुषाचे अभंग, त्याचा काळ,त्यावेळची परिस्थिती समजून घेण्यासाठी केलेला हा एक प्रयत्न आहे.

हे समग्र चरित्र नव्हे ! " पण त्याची भावकविता मात्र निश्चित. ! "

ज्ञानदेव हे चक्रधरानंतरचे दुसरे बंडखोर कवी होत. यांनी संस्कृत भाषेत असणाऱ्या गीता ' या मूळ ग्रंथाचा अर्थ ज्ञानेश्वरीत अडाणी लोकांना समजून सांगितला. ज्ञानेश्वरीबरोबरच ज्ञानेश्वरांच्या नावावर 'अमृतानुभव', चांगदेव पासष्टी आणि 'अभंग गाथा ' या चार प्रमुख रचना मोडतात. या बरोबरच योगवसिष्ठ, आत्मानुभव इ. पंचवीस ग्रंथांचे कर्तृत्व ज्ञानेश्वरांच्याकडे दिले जाते.

तात्पर्याने वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी महान रचना करणारा हा अलौकिक पुरुष होता. मराठी भाषेची थोरवी व जीवनाचे तत्त्वज्ञान त्यानी लोकांना समजून सांगितले.

## भक्त नामदेव

निवृत्तीनाथ,ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई यांच्याबरोबर वारकरी संप्रदायाचे प्रसारक नामदेव होत. नामदेवांची गुरु परंपरा विसोबा खेचरापासून सुरू होते व विसोबा खेचर निवृत्तीनाथाप्रमाणेच नाथसंप्रदायाचे होते.

महाराष्ट्र, कर्नाटक, पंजाब या परप्रांतात वारकरी संप्रदायाचा प्रसार भक्त नामदेवांनी केला. पंच्याऐंशी वर्षे आयुष्य लाभलेल्या या संताची भक्ति भोळीभाबडी होती.

## समकालीन संत

ज्ञानदेवांचा कालखंड हा रामदेवराय यादवांचा कालखंड मानला जातो. सुखी आणि संपन्न राजवट या काळात होती. सोन्याचा धूर याच काळात निघत होता. याच काळात मुक्ताबाई, जनाबाई, परिसा भागवत, बिसोबा खेचर, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, जोगा परमानंद, सेना न्हावी, कान्होपात्रा, चोखामेळा इत्यादी संत आपल्याला आढळतात.

हे सर्व संत विविध जातीचे आहेत. यातील प्रत्येकाचा व्यवसाय वेगवेगळा आहे. आणि म्हणूनच प्रत्येक संताने आपल्या व्यवसायातले शब्द आपल्या रचनेत वापरलेले आहेत. चोखा मेळा ' चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा ' असा स्वतःचा उल्लेख करतो. त्याचबरोबर नरहरी सोनार, सावता माळी, कान्होपात्रा यांच्या रचनेतून त्यांच्या भक्तिबरोबरच व्यवसायाची माहिती आपल्याला आढळते.

## संत एकनाथ । ध्वज उभारी भागवत

नामदेवांच्यानंतर भानुदासाचे पणतू एकनाथ यानी या संप्रदायाची परंपरा पुढे चालवली. त्याचा जन्म ' पैठण ' याठिकाणी झाला. भक्तिबरोबरच सामान्य लोकांच्या भाषेत त्यांनी वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान सामान्य जनतेला समजावून दिले. संत एकनाथा पासून वारकरी संप्रदायास भागवतधर्म हे नाव अधिक रूढ झाले. आज फक्त महाराष्ट्र नव्हे तर आपल्या देशाच्या बाहेरही या संप्रदायाची

पताका फडकताना दिसते आहे. यंत्रयुगामुळे खेडी मोडली जावू लागली आहेत. रस्ते झाले, शाळा कॉलेजे झाली, नवा माणूस तयार होतो आहे. पण त्याच्या मनातला पांडुरंग अजून हरवलेला नाही. नवी पिढी तो हरवू पहाते आहे. या नव्या पिढीस आमच्या साधुसंताची नव्याने ओळख करून देणे आवश्यक आहे.

या वारकरी संप्रदायाचा कळस म्हणजे, संतश्रेष्ठ तुकाराम होय! जो कवी होता. त्यापूर्वी संत होता. व त्याही अगोदर एक गृहस्थ होता. एका संसारी माणसाने ध्यास घेतला तर त्याचा जीवन पट कसा बदलू शकतो याचे नमुनेदार उदाहरण म्हणजे संत तुकाराम होय !

ख्रिस्ती मिशनरी, मराठीतील टीकाकार यांनी या संतावर टीका केली आहे. ही टीका एकांगी स्वरूपांची आहे. त्यात जातीचा अभिमान आढळतो किंवा या थोर पुरुषांस न समजून घेणे आपणांस आढळते.

नव्या दृष्टीने, नव्या विचाराने या संतपुरुषाचे अभंग, त्याचा काळ,त्यावेळची परिस्थिती समजून घेण्यासाठी केलेला हा एक प्रयत्न आहे.

हे समग्र चरित्र नव्हे ! " पण त्याची भावकविता मात्र निश्चित. ! "

# प्रकरण : तीन

## कुल परंपरा

तुकारामास उज्वल परंपरा होती. त्याचे पूर्वज हे सात्वीक प्रवृत्तीचे होते. त्यामुळे तो ' शुद्ध बिजा पोटी ' असे दाखले देतो. इतर संतांनी आपल्या पूर्वजांची फारशी माहिती दिलेली आढळत नाही. तुकारामांचे कुळ मात्र पुण्यशिल असावे असे त्यांच्या रचनेतून आपणांस दिसते. " तुकारामापासून आठवा मूळ पुरुष विश्वंभर हा त्या परंपरेचा जनक होय. विश्वंभरापूर्वीच्या माहितीची कोणी नोंद करून ठेवलेली दिसत नाही. पण हा काळ नामदेव समकालीन असावा." असे मत पु. म. लाड यांनी व्यक्त केले आहे.

पूर्वीपासूनच विठ्ठलाची भक्ती त्यांच्या घरात होती. विश्वंभर या आठव्या पुरुषाची आई पंढरीची आठवण करून देते. हा उल्लेख भक्त लीलामृत या ग्रंथाच्या २५ व्या अध्यायात आढळतो. विश्वंभराची आई त्याला म्हणते.

आता पंढरीस जावया कारणे
सिद्ध होणे सत्वर
तुझ्या वाडवंडीली निर्धारी
चालविली पंढरीची वारी
त्यासी सर्वथा अंतर न करी
(भक्त लिलामृत अ. २५ ओ. २३–२४)

अशा वारीची ती आठवण करून देते.

आईचा उपदेश विश्वंभराच्या मनात ठसला. तो वारंवार पंढरपूरास जावू लागला. पुढे विठ्ठल स्वप्नात आले. व तू येथून पुढे पंढरपुरास येवू नको. मीच तुझ्या गावात रहावयास आलो आहे.

" ऐसे बोलो निया चक्रपाणी ।
गेले आंबीयाचे वनी ।
निद्रीत जाहले तथे स्थानी ।
इतुके स्वप्नी देखिले. ।।

स्वप्न दृष्टान्ताप्रमाणे विश्वंभर त्या आंब्याच्या वनांत गेला. त्याठिकाणी त्यास मूर्ती सापडली. ती त्याने मिरवणूकीने आणून देवू या गावात स्थापन केली. मूर्ती आंब्याच्या वनांत सापडली होती. त्यामुळे या मूर्तीस ' विठ्ठल आंबा 'असे म्हणतात. या मूर्तीची पूजा आजही देहू या गावी चालते. तुकारामापूर्वी देहूत विठ्ठलाची भक्ती होती. त्याचा पूजापाठ चालत होता. हे यावरून समजते. या मूर्तीच्या खर्चासाठी काही वतनही मिळाले होते. त्या वतनास ' विठ्ठलटिके 'असे म्हणतात.

पुढे विश्वंभरास हरी व मुकुंद हे दोन पुत्र झाले. त्याना विठ्ठलाची भक्ती करण्यापेक्षा सैन्यात जावे वाटत होते. त्याप्रमाणे ते दोघे गेले. पण आई घरीच विठ्ठलाची भक्ती करत राहीली. पुढे या दोन्ही पुत्रांना सोन्याचे, वैभवाचे दिवस आले. आपल्या आईस नेण्यास ते देहू या ठिकाणी आले. आईची समजूत घातली. तिला घेऊन गेले. पण लवकरच त्यांना युद्धात मरण पत्करावे लागले. त्यापैकी मुकुंदाची पत्नी सती गेली व हरीची पत्नी गरोदर होती. ती आपल्या माहेरी गेली, पुढे या सुनाना सोडून विश्वंभराची बायको ' आमाई ' ही परत देहूस आली. विठ्ठलाची भक्ती करू लागली. पण तिची दृष्टी गेली. त्यामुळे तिची सेवा खुद्द विठ्ठलाने केली असे सांगतात.

पुढे हरीची पत्नी प्रसूत झाली. तिला मुलगा झाला. त्याचे नाव विठोबा असे ठेवले. आजीच्या मृत्यूनंतर तो आईसह देहू याठिकाणी आला. अशी ही तुकारामाची वंशावळ महिपतीने दिलेली आहे.

**विश्वंभर (मूळ पुरुष)**

- मुकुंद
- हरी
  - विठोबा
    - पदाजी
      - शंकर
        - कान्हया
          - बोल्होबा
            - तुकाराम

ही महिपतीने तुकारामाची दिलेली परंपरा काल्पनिक नाही. भारदे–पांगारकर याना ज्या वंशावळी मिळाल्या त्या या परंपरेशी जुळतात असा दाखला लाड यानी दिला आहे. मूळ श्लोक असा–

त्या विठोबाचा पुत्र जाण ।
पदाजी त्याचे नामाभिदान ।
त्यानेही करोनी सप्रेम भजन ।
रुख्मीणीमन आराधिला ।।
पदाजीचा पुत्र शंकर ।
त्याने पूजीला रुक्मीणीवर ।
कान्हा या शंकराचा कुमर ।
बोल्होबा पुत्र जयाचा ।
त्या बोल्होबाचे पोटी परम ।
वैष्णवभक्त तुकाराम ।।

तुकारामाचे पिता बोल्होबा यांना वेल्होबा असेही म्हटले जात होते.

तात्पर्याने तुकारामांच्या घरात पूर्वजापासून विठ्ठलभक्ती चालत होती असे म्हणायला हरकत नाही. कारण–

–माझ्या वडिलांची ग देवा
तुझी चरणसेवा, पांडूरंगा असे तुकाराम म्हणतो.

पंढरीची वारी । आहे माझ्या घरी ।
आणीक न करी तीर्थव्रत ।

असा निर्वाळाही त्याने दिला आहे.

तुकारामाच्या वडीलांचे नाव ' वेल्होबा ' व आईचे नांव ' कनकाई 'असे होते. त्याला दोन भाऊ होते. मोठा सावजी व धाकटा कान्होबा. यापैकी मोठा विरक्त होवून निघून गेला. तर धाकटा कान्होबा हा विठ्ठल भक्त होता. वयाच्या १४ व्या वर्षी त्याचे लग्न रखमाईशी झाले. पण ती नेहमी आजारी असे, त्यामुळे त्याचे दुसरे लग्न जिजाबाईशी केले. तिला ' आवली ' असे ही म्हणत. ती मूळ घरची श्रीमंत होती. तिच्या वडीलांचे नाव आप्पाजी गुळवे असे होते.

पुढे तुकारामावर संकटाची परंपरा आली. त्याचे आई–वडील मरण पावले. मोठा भाऊ सावजी विरक्त झाला व घरातून निघून गेला, मोठ्या भावाची बायको मरण पावली. दुष्काळ पडला. त्यात त्याची पहिली बायको व मूल मरण पावले. संसाराचा सारा भार तुकारामावर पडला. दुकानाचे दिवाळे निघाले. कर्जे वाढतच गेले. दुसरी बायको भांडखोर निघाली.

बाईल कर्कशा । बरी ही दुर्दशा असे त्याला वाटू लागले.

पोर मेले । बरे झाले ।
बाईल मेली मुक्त झाली
देवे माया सोडवली
विठो गेला तूझा माझा आजा–पणजा
नाही इतरांच्या काजा ।।

असेच तुकारामास वाटू लागले, व यातूनच तो विठ्ठल भक्तीकडे जास्त ओढला गेला. ' माझ्या वडिलांची मिराशी गा देवा, तुझी चरण सेवा पांडुरंगा असे त्यास वाटू लागले

' वंश परंपरेचा दास मी अंकीत
तुका मोकलिता लाज कोणा ? '

मी माझ्या कुळाप्रमाणे तुझा अंकीत आहे. मी तुझाच हमाल आहे व तू पेढीचा मालक आहेस.असे उद्‌गार त्याच्या मुखातून निघाले,यात नवल ते कसले ?

तात्पर्याने तुकारामाचा मूळचा पुरुष हा विश्वंभर होय. त्याच्यापासून त्याच्या घरात विठ्‌ठल भक्ती आली. व ती तुकारामाने पुढे चालविली–समृद्ध केली. फक्त त्याच्या घरानेच ही परंपरा चालविली का ? तसे पहाता– साधूसंताना घर नसते. हे विश्वची माझे घर! ही त्याची वृत्ती असते. तरीही ' शुद्ध बिजापोटी असती फळे रसाळ गोमटी ' हे ही आपणास विसरता येणार नाही.

तुकाराम हा कोणत्याही विद्यापीठाचा पदवीधर नव्हता. त्याला फक्त अक्षर ओळख होती. अवतीभवतीच्या साधूसंताचे कथाकीर्तन त्याने ऐकले होते. पण मूळचा झराच खरा होता. त्याची उक्ती वर्डस्‌वर्थच्या व्याख्येप्रमाणे होती. त्यामुळे त्याचे अभंग ' अभंग ' राहिले.

त्याच्या घरी वारकरी संप्रदाय होता. घरीच विठ्ठलाची मूर्ती होती. बाह्य वातावरण त्याने अधिक अंतर्मुख व्हावे असे होत गेले. विरक्ती आली. यावेळी एकच आधार होता तो म्हणजे विठ्ठलाचा ! पांडूरंगाचा ! !

' नाही निर्मळ जीवन । काय करील साबण ' हे त्याने ओळखले. आपले चरित्र महत्त्वाचे नाही तर त्यासाठी आपले चारित्र्य कसे असावे ? ह्याची जाण या थोर पुरुषास होती.

त्यामुळे त्याचा पिंड भोवतालची परिस्थिती, घरचे वातावरण यामुळे एकाकी झाली व अधिकाधिक त्याची पावले चालली पंढरीची वाट !

## प्रकरण : चार

## तुकारामाचे नाव – आडनाव व इतर

तुकारामाच्या आईचे नाव 'कनकाई' असे होते त्यावेळी 'तुकाई' या नावाची देवी होती. त्यावरून 'तुकाराम' हे नाव ठेवले असावे. कारण आपल्याकडे प्रत्येक नावात देवतांचे रुप असते. 'तुकाई' या नावावरून तुकारामास 'तुकाराम' हे नाव पडले–मिळाले–दिले असावे.

तुकारामाच्या आंडनावाबाबतही काही मते आपणांस आढळून येतात. तुकारामांचे आडनाव आंबीले होते. असे काही जाणकारांचे मत आहे. या मतांसाठी ते पुढील कथा सादर करतात. तुकारामाच्या कुणीतरी पूर्वजाने विठ्ठलास आंबील पाजली व त्यावरून त्यास 'आंबिले' हे नाव पडले

श्री. पु. म. लाड यांनी तुकारामांचे मूळचे नाव आंबीले हे रूढ आडनाव होते. त्याच्या मुलांनी विठोबा – महादेव – नारायण यानी तेच नाव लावल्याचे कागदोपत्री सापडते.

तुकारामाचे मूळ घराणे 'मोरे' असे होते. व आंबले या गावावरून किंवा वर सांगितल्याप्रमाणे त्यास आंबिले हे नाव पडले असावे. आज मात्र तुकारामांचे वंशज मोरे हे नांव लावतात. तुकारामाच्या घराण्यात महाजनकी होते. स्वतःच्या व्यापारी वृत्तीचा तो उल्लेख ही करतो.

'याती शूद्र–वैश्य केला वेवसाय' असेही त्याने म्हटले आहे.

तुकारामावर लेखन करणाऱ्या लेखकानी आपआपल्या वृत्तीप्रमाणे त्याच्यावर लेखन केले आहे. वि. ल. भावे याना तुकाराम ब्राह्मण नसल्याचे वाईट वाटले. परळकराना त्याच्या क्षत्रीयत्वाचा आनंद वाटला. तर तो वृत्तीने शूद्र होता यावर काहीनी भर दिला. हा वाद महत्वाचा नसून–

तुकारामाचे कुळ हे मोरे होते. त्यांचे उपनाव आंबिले होते. तर तो जातीने मराठा होता. शेती – व्यापारवृत्ती यामुळे तो स्वत:स कुणबी म्हणतो. शिवाजी महाराजानी पुणे परगण्यात त्याच्या मुलांना केलेल्या आज्ञापत्रात त्यांची महाजनकी पूर्वीप्रमाणे चालू ठेवावी अशी आज्ञा केली आहे.

त्यावेळी तुकारामाची पूर्वीपासून महाजनकी असली तरी तो वृत्तीने व्यापारी होता.

' बरें झाले देवा, निघाले दिवाळें
बरी या दुष्काळें पीडा केली '

असे तो म्हणतो – किंवा–

फोडीले भाडांर, धन्याचा हा माल
मी फक्त हमाल, भार वाही–

अशा भक्तीची व्यापार पेठ ही स्पष्ट करतो.

अशा या संताच्या जन्म शंका बाबतही मत मतांतंरे दिसून येतात. तुकारामाचे मरतेवेळी वय ८०–८२, ६०–६२, ४०–४२, होते असे अनेकांनी त्याचा जन्म-तिथी दिली आहे. त्यावरुन म्हणावेसे वाटते.

तुकारामाचे निर्वाण फाल्गुन वद्य पंचमी शके १५७१ ही सर्वांना मान्य आहे.

तुकारामांचा जन्म खालीलप्रमाणे दर्शवितात.

१) १४९० – राजवाडे – करंजखोप येथील वंशावळ
२) १५१० – कवीचरित्र
३) १५२० – तुकारामाची वंशावळ देहू येथील
४) १५३० – महिपतीच्या आधारे

वरील जन्मशक व निर्वाणशकावरून तुकारामाची जन्मनोंद करावी लागते.

मृत्युसमयी तुकारामास मुले, बाळे, लेकरे होती, असे कान्होबाच्या विलापावरुन कळते. त्याचबरोबर त्याची पत्नी गरोदर होती व ८०–८२ वयात हे शक्य नाही. त्यामुळे ' जरा कर्ण मूळा दिसोनिया आली ' या ओळीवरून वृद्ध झाला होता असे काहीचे मत आहे. पण सर्व विचारांचा मागोवा घेता पु. म. लाड यांनी शके १५३० हे जन्म शक मानले आहे ते बरोबर वाटते.

म्हणजे त्यास ४०–४२ वर्षाचे आयुष्य मिळाले व या काळांत

१२ वर्षे बालपण १४ वर्षे लग्न संकट मृत्यू दृष्काळ कवित्व, मृत्यू असा त्याचा जन्मपट आपणांस दाखविता येईल.

तात्पर्याने –

१) तुकारामाचा जन्मशक १५३०
२) तुकारामाचा मृत्यू १५७१

त्यांचे कूळ मोरे. आडनाव आंबीले. जन्म ठिकाण देहू होय.

तुकारामाचा मृत्यू कसा झाला ? याविषयी एकूण चौदा मते आहेत.

‘ एक एका अकस्मास
तुकारामा आले गुप्तरुप ’

असे व्हावे तसा तुकाराम इंद्रायणीच्या काठी असणाऱ्या जंगलातून नाहीसा झाला. काही दिवस त्याचा आवाज, ‘ रामकृष्ण हरी हा मंत्र ऐकू येत होता. त्यानंतर भक्ताना त्याची घोंगडी आलेली दिसली. तो सदेह वैकुंठास गेला. यावरून ही मते मांडली गेली आहेत. परमेश्वराचे विमान त्यास न्यायला आले व घेवून गेले किंवा विमानाकृती तयार करून त्याचा अग्नीसंस्कार केला. तर त्याचा खून झाला, इथपर्यंत मते मांडली गेली आहेत.

तरीही आपण दुसऱ्यास दिसतो किंवा एखादी वस्तू आपणास दिसते याचे कारण, आपले शरीर किंवा ती वस्तू काही किरणे बाहेर फेकत असते. जेंव्हा ती वस्तू किरणे फेकायची थांबते तेव्हा ती अदृश्य होते.

तुकारामाचे असेच झाले असावे ! त्यामुळे इतर विधानांचा परामर्श न घेता शेवटचे मत बरोबर वाटते.

## प्रकरण : पाच

## तुकारामाचे बालपण - व्यापार - संकटाची परंपरा

आज मानव यंत्रयुगात वावरतो आहे. तरीही बालमानसशास्त्र हे शास्त्र दूर करत नाही. बालांचे मनोव्यापार समजून घेणे त्यास आवडते. मोठी माणसे जेंव्हा लहान होती तेंव्हा ती कशी वागत होती? वागत असली पाहिजे ? याविषयी आपण तर्क लढवितो.

ज्ञानेश्वरांचे बालपण हे त्यांच्या चरित्रातून आपणासमोर उभे राहते, तसे तुकारामांच्या बालपणाविषयी काही कथाही ऐकायला मिळतात. तुकाराम एके दिवशी गुरे चरावयास घेऊन गेला पण गुरे आणताना एकटाच आला. त्याचा चुकारपणा पाहून आईने त्यास 'मर जा!' असे म्हटले. तेंव्हा त्याने मित्रानां गोळा केले. तिरडीवर तो झोपला. मुलांनी त्यास नदीच्या वाळुत पुरले. पण मोठा पूर आला. मुले पळून गेली. आईने हाक मारताच त्याने 'ओ' दिली व तो नदीतून बाहेर आला.

तुकारामाविषयी चरित्रकार महिपती याने जी उदाहरणे दिली आहेत त्यावरुन त्याचे बालपण कसे होते? हे आपणास समजते.

प्रसंगी आई–मुलांवर तुकारामाने लिहीलेले अभंग वाचल्यानंतर त्याने लहानपणी या गोष्टीचा अनुभव घेतला असाला पाहिजे हे कळते.

पोटा आले बाळ
त्याचे जाणावे सकळ ।।

या तुकारामाच्या अभंगातून एक कवी एक तत्ववेत्ता या पेक्षा आई आपल्या नजरेसमोर उभी रहाते.

मुलास बापाची भीती वाटता कामा नये, बाप हा मित्रासारखा असला पाहिजे. असेही विचार तो प्रकट करतो.

इतर मुलाप्रमाणे तुकाराम मुलांत हुतूतु, हुंबरी, हमामा हे खेळ खेळत असला पाहिजे. एव्हढेच काय ? मुलींच्या मंगलदायिकात तो रमला असला पाहिजे. गावात खेळल्या जाणाऱ्या मस्तीच्या खेळातही त्याने भाग घेतला असला पाहिजे.

बाळपणे ऐसी वरूपे गेली बारा ।
खेळता या पोरा नानामते ।।१।।
विटी दांडू चेंडू लगोऱ्या वाघोडी
चंपे पेंड खडी एकीबेकी ।।
हमामा हुंबरी पकव्याचे बारे ।
खेळे जंगी भोवरे चुंबाचुंबी ।।२।।
सेलडेरा आणि निसरमोंवडी
उचली बाले धोंडी अंगबाळे ।।३।।
तुका म्हणे ऐसे बालपण गेले
मग तारुण्य आले गर्व मूळ ।।४।।

तुकारामाने ही यादी अभ्यासातून दिलेली नाही. तर त्याने प्रत्यक्ष खेळ खेळले आहेत. लहान मुले खेळताना रडी खातात. त्याचेही तो वर्णन करतो.

तुका म्हणें तुम्ही खादली हो रडी
आम्ही धरीली सेंडी नाम तुझे ।।

खेळ गड्यात फजिती होणे आणि फजिती करणे हे प्रकार असतातच. या अनुभवातून त्यांचे बालपन निश्चित गेले आहे.

वेदविद्या शिकण्याचा मात्र त्याला अधिकार नव्हता. म्हणून तो म्हणतो–

घोकाया अक्षर । मज नाही अधिकार
सर्व भावे दीन । तुका म्हणे यातीहीन ।।

आपली याती शुद्र आहे. त्यामुळे शिक्षणाचा अधिकार आपणास नाही याची त्यास खंत वाटते.

पण घरात महाजनकी होती. त्यामुळे निव्वळ व्यवहारज्ञानाचे तरी त्याला अक्षरज्ञान असले पाहिजे. तुकारामाला लिहीता येत होते हे निश्चित ! याविषयी कुठेही दुमत आपणास आढळून येत नाही. बालपणीच त्याने लेखणी हाती धरली असली पाहिजे. एवढेच नव्हे तर गावात होणाऱ्या कथाकिर्तनामुळे त्यास बहुश्रुतता प्राप्त झाली असली पाहिजे. त्याचे बालपण हे देहूसारख्या खेड्यात गेल्यामुळे, खेड्यातील संस्कार, त्याच्या मनावर झालेच होते–

पहाटे दळणाऱ्या बायका, पाणी आणण्यास इंद्रायणीवर जाणाऱ्या बायका, पंढरीस जाणारे वारकरी, देवळात होणारी कीर्तने, गावातील भांडणतंटे या साऱ्यामुळे त्याचे बालमन तयारच झाले असले पाहिजे. थोर संताची व भक्तांची चरित्रे त्याने मंदिरातच ऐकली असली पाहिजेत. तसे त्याचे बालपण हे पुण्याच्या परिसरात गेले. त्यास संस्कृतीचे ज्ञान निश्चित होते. जगाचा बाजार–व्यवहारज्ञान या गोष्टी त्याने पाहिल्या होत्या. व्यापार करत असताना या गोष्टीतच त्याचा दिवस जात होता.

लहानपणापासून व्यवहाराच्या गोष्टी त्याच्या कानावरून गेल्या. मोठा भाऊ सावजी हा विरक्त होऊन निघून गेला. खरे तर सारा संसाराचा गाडा मोठ्या भावाने सांभाळायला पाहिजे होता. वडिलांनी तसे त्यास सुचविलेही होते. बोल्होबा त्यावेळी ६०–६५ वर्षाचे असावेत.

आता आमुचे वार्धक्यपण
तू वडील पुत्र सुजाण
तरी संसारात घालोनी मन
देणे मागणे सांभाळी ।।
पाहोनी खर्डा खतावणी
ऐवज सर्व ध्यानासी आणी ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निषेध

वडिलांचे हे बोल मोठ्या सावजीने ऐकले व आपणास तीर्थाटनांस जाण्यास परवानगी मागितली. साहजिकच संसाराचा सर्व भार तुकारामावर आला. त्यात मोठ्या भावाची पत्नी वारली.

एकाएकी केला मिरासिचा धनी ।
कडिये वागवोनी भार खांदी

ज्या दुकानाची मालकी किंवा जो व्यवहार तुकारामास मिळाला होता; तो कर्जांत बुडालेला होता. घरच्या जमिनी, दागिने यावर कर्ज काढलेले होते. त्यामुळे–

चुकलिया ताळा । वाती घालूनी बैसे डोळा ।।

अशी तुकारामाची मन:स्थिती झाली.

चार वर्षातच त्याने दिवाळे काढले असे म्हणण्यापेक्षा दुकानाचे दिवाळे निघाले.

त्याची उदासवृत्ती वाढत राहिली. जीवनातला व्यवहार आतबट्याचा झाला. परमेश्वर भक्तीचा व्यवहार तरी जमतो कां ? इकडे त्याचे ध्यान लागले.

तुकारामाचा पहिला विवाह त्यावेळच्या रितीरिवाजाप्रमाणे लहान वयातच झाला होता. त्याची पहिली बायको लोहगाव येथील होती. तिचे नाव रुक्मिणी असे होते. ती त्याच्या नात्यातीलच होती. त्याच्या या लग्नात बराच खर्च केला होता असे चरित्रकार महिपतीवरून दिसून येते. त्या काळाप्रमाणे त्याचे हे कुटुंब एकत्र कुटुंब पद्धतीचे होते घरात समृद्धता होती. चारित्र्य आणि चरित्र या दोन्हीही

गोष्टी या घरात नांदत होत्या. काही लेखकांनी तुकारामाच्या तारुण्यावर काही आरोप केले आहेत. पण ते चुकीचे आहेत.

१) खेळ द्यूतकर्म । मग बोंबली जुलूम ।

२) भोग स्त्रियेसी देता लाजे
वस्त्र दासीचे घेवूनी निजे

या त्याच्या पुढील अभंगावरून तरुणपणी हे प्रकार त्याने आसपास पाहिले असले पाहिजेत हे पटून जाते.

महाराष्ट्र सारस्वतकारांनी तुकाराम तारुण्यात वहावला होता असे म्हटले आहे. ज्या अभंगाचा भावे आधार घेतात तो 'परस्त्री आतां मज मातेसमान' यावरून त्याचे लक्ष आता परमेश्वर भक्तीकडे वळले होते असे दिसते.

पहिली बायको ही दमेकरी होती. त्यामुळे तुकारामाचा संसार नीट चालणार नाही म्हणून त्याच्या वडिलांनी आप्पा गुळवे या श्रीमंत माणसाची मुलगी दुसरी पत्नी म्हणून आणली. हे त्याचे दुसरे लग्न वय १३ ते १७ या वयात झाले असावे, या दुसऱ्या पत्नीचे नाव आवळी किंवा आवडी असे होते.

त्याकाळी दोन बायका करण्याची पद्धत होती. पण पुढे मात्र तुकारामास त्याचे वाईट वाटले.

लवकरच त्याच्या पहिल्या पत्नीस मूल झाले; पण ती व ते मूल दुष्काळात दगावले व पुढील काळात त्याला जिवलगाचा वियोगच सहन करावा लागला.

बाप मेला मज न कळता ।
तुका म्हणे हरली संसाराची चिंता ।।
बाईल मेली । मुक्त झाली
देवे माया सोडविली ।।

या अभंगावरून पिता, पत्नी मेले असे दिसून येते.

पोर मेले बरे झाले ।
देवे माया सोडविले ।।

या मायेतून आपण मुक्त झालो हेही त्यास बरेच वाटते. बापाच्या मृत्यूमुळे व मोठा भाऊ सावजी घरातून निघून गेल्यामुळे त्याच्यावर संसासाची जबाबदारी पडली. दुसरी पत्नी व मूल मेले हाही दुसरा आघात त्याच्यावर पडला. त्यातच दुर्गादेवीचा दुष्काळ पडला. हा १२ वर्षेपर्यंत होता असे म्हणतात. दुकान कर्जात गेले.

संकटे ही चोरपावलांनी सुरुवातीस येतात. नंतर मात्र ती राजरोस येतात. तसेच घडले. अनेक संकटातून तुकाराम व्यापला व संसार असार आहे असे त्यास वाटू लागले.

## प्रकरण : सहा

### साधना – कवित्व

अनेक संकटातून मानवाला जीवनभर प्रवास करावा लागतो. या संकटाना सामोरे जाण्यासाठी त्याला मानसिक आधार हवा असतो. आपल्या भवताली असा आधार सापडतो का ? हे तो पहात रहातो. पण असा आधार मिळणे शक्यच नसते. व्यवहारात स्वार्थी माणसेच अधिक भेटतात. त्यामुळे तहानलेल्याला पाणी मिळण्यापेक्षा त्याचे हालच अधिक होणे संभवते.

तुकाराम हा सुद्धा एक हाडामांसाचा माणूस होता. त्यालाही संसार होता. पण या संसारात ज्यावेळी अनेक संकटे त्याच्यावर ओढवली. त्यावेळी ईश्वरापेक्षा दुसरा आपला वाली नाही हे त्याने अंतर्ज्ञानाने जाणले. न पेक्षा वेलीवर सहज फूल यावे तसे त्याच्या मनात ईश्वराने घर केले.

आईवडील वारले, मोठा भाऊ सावजी विरक्त होऊन निघून गेला. दुसरी पत्नी भांडखोर निघाली. दुकानाचे दिवाळे निघाले. साहजिकच त्याच्या मुखातून आपोआप कविता जन्मास येऊ लागली.

" काय म्यां पामरें
बोलवी उत्तरें
बोलविता धनी वेगळाची "

असे आपले कवित्व त्याने परमेश्वरास देऊन टाकले.

ऐहिक जीवनात पूर्णत: वैराग्य पत्करले. संसार असार मानला. परमेश्वराचा ध्यास धरला हीच त्याची अध्यात्मिकतेची पहिली पायरी होय.

एक साधा कुणबी माणूस म्हणून जीवनास प्रारंभ करून अखेर तुकाराम देवमय झाला.

या पहिल्या पायरीपर्यंत त्याचे येणे म्हणजे एक अंधारी रात्र होती. ती परस्परांविषयी आत्म्याची लढाई होती.

काय म्यां पामरें । बोलावी उत्तरें
बोलविता धनी । वेगळाची ।।

याची त्यास जाणीव झाली.

"आता देवाचे चरण धरले आहे. ते काही झाले तरी सोडणार नाही. आळस म्हणजे आत्म्यास लागलेली कीड होय. याची त्याला पूर्णपणे जाणीव झाली. त्यामुळे त्याने संसार, लोकलज्जा या गोष्टींना रामराम ठोकला. कारण या गोष्टी परमेश्वर प्राप्तीच्या आड येतात. म्हणून त्याने स्वतःच्या मनास आवर घातला.

' फजितखोर मना, कोणामागे लागू नकोस. स्नेह–प्रेम याची फिकीर करू नकोस. सुखदुःखाकडे लक्ष देवू नकोस. वज्रासारखा कठीण हो ! '

' मला निसंःतान, निर्धन, बेघर कर; म्हणजे मी तुझ्या भक्तीकडे वळेन. ' असे म्हणणारा तुकाराम पूर्णतः विरक्त झाला होता. विठ्ठलाच्या नामस्मरणापेक्षा दुसरे त्यास काहीच आठवत नव्हते. निव्वळ ध्यानधारणा या काळात तुकाराम अभंग लिहीत नव्हता. तर तुकाराम अभंग जगत होता. सहजस्फूर्त त्याच्या मुखातून हे शब्द अभंग बाहेर पडत होते. ती त्याच्या जीवनाची कविता होती.

आपला देह क्षणभंगूर आहे. गोड खाऊन विलास करावा हा अधर्म आहे. हे जीवनच सारे क्षणभंगूर आहे. एक ना एक दिवस हा मृत्यू आपला घास करून टाकणार आहे. म्हणून शरीराकडे दुर्लक्ष केले पाहिजे. ऐन म्हातारपणात परमेश्वराची आठवण होण्यापेक्षा योग्य वेळीच तुझी आठवण झाली हे माझे भाग्य समजतो.

परमेश्वराशिवाय आपण मृत्यूला जिंकू शकणार नाही. म्हणून रात्रंदिवस त्याचा ध्यास करणं हेच आपले काम आहे. कारण आईवडील, सगेसोयरे कुणीच आपल्याला मृत्यूपासून वाचवू शकणार नाही.

संसार सोडल्यानंतर तुकारामाची साधकावस्था एकाकी अवस्थेत सुरू होती. या काळात विठ्ठलाचे ध्याना याशिवाय त्याला दुसरे काहीच दिसत नव्हते, कळत नव्हते आणि यातच तुकारामाला कवित्वाची स्फूर्ती झाली. संत नामदेव त्याच्या स्वप्नात आले. ' उरलेले कोटी अभंग तू पूर्ण कर ' असे सांगून गेले. संत नामदेव यानी केलेला उपदेश तुकाराम पुढीलप्रमाणे देतो.

' नामदेवे केले स्वप्नामाजी जागे ।
सवे पांडूरंगे येवोनिया ।।
सांगितले काम करावे कवित्त्व ।
उगे निमित्त बोलू नये ।।
माप टाकी सळे धरीली उत्तरे ।
थापटोनी केले सावधान ।।
प्रमाणांची संख्या सांगे शतकोटी ।
उरले ते शेवटी लावी तुका ।।

नामदेवाने स्वप्नात एक कोट अभंगाची पूर्तता करण्याची आज्ञा केली आणि मूळचाच झरा खरा ठरला. त्याला विनयाची झालर आली, मीही कवित्व करतो असे कोणी म्हणत असाल तर हे कवित्व माझे नव्हे. विश्वंभर माझ्या मुखातून बोलतो. मी अर्थवेद काहीच जाणत नाही. गोविंदच माझ्या मुखातून वदवत असतो. संतांचे उष्टे काढणे एवढेच माझे काम आहे.

फोडीले मांडार धन्याचा हा माल ।
मी फक्त हमाल भार वाही ।।

विठ्ठलाच्या या भक्तिपीठाचा मी हमाल असून निव्वळ भार वाहण्याचे काम करतोय.

तुकारामाची कविता ही त्याच्या आत्मप्रत्ययातून जन्माला आलेली आहे. त्याच्या मुखातून येणारा शब्द हा ईश्वराचा शब्द असतो. संसारातील अनेक आपत्तीतून तो जन्माला आलेला आहे. त्यामुळेच तुकारामाची कविता ही त्याच्या जीवनाचे चिंतन आहे.

या काळात तुकाराम भामनाथाच्या डोंगरावर जाऊन ध्यानचिंतन करू लागला. हा डोंगर देहूपासून दोन–तीन किलोमीटर अंतरावर आहे. मध्ये इंद्रायणी नदी वाहते.बायका–मुले यांचा त्याने त्याग केला होता व रात्रंदिवस तुकाराम अभंग जगत होता. विठ्ठलाची भक्ती करणे हाच त्याच्या जीवनाचा धर्म बनत होता. वेदपुराण यांच्या अभ्यासाचा त्याचा अधिकार नाकारलेला होता तरीही जीवनाचे तत्त्वज्ञान तो सहजपणे आलेल्या अनुभवातून बोलत होता. व यातूनच त्याच्या कवित्वानंतर कीर्तनाला सुरुवात झाली.

तुकाराम ही एक अवतारी व्यक्ती. प्रपंच आणि परमेश्वर या दोन गोष्टींचा ध्यास त्यानी घेतलेला होता. अनुभवाचे पाथेय जवळच होते. ठिणगी पडली होती, फुंकर घातली गेली होती व या आवेगातून जिवंत साहित्याची निर्मिती होत होती.

तुकारामांना संस्कृत येत असले पाहिजे असे मत पांगारकरांनी व्यक्त केले आहे. हे त्यांचे संस्कृत जीवनाच्या पाठशाळेत तयार झाले होते. अनुभवाच्या मुशीतून शब्द जन्म घेत होते. शुद्ध कसे बोलावे आणि लिहावे, मी तर खेडवळ कुणबी. अशी त्याची समज होती. पण समृद्ध अनुभवातून आणि वेदनेतून जिवंत कविता जन्माला येते. याचे पहिले उदाहरण म्हणजे तुकाराम होय.

तुकोबाने आयुष्यात जे जे भोग भोगले त्यांनाच शब्दरूप केले. साधूसंतांचा मार्ग चोखाळला. नित्य नवीन दिवस जागृतीचा मानला आणि दु:खातूनच त्याची कविता जन्माला आली. आपण क्षुद्र आहोत; कवित्व करण्याचा अधिकार नाही पण पांडुरंगाने जे जे सांगितले ते तेच मुखावाटे बाहेर पडले असे तुकाराम म्हणतो. तात्पर्याने तुकारामाने एकाकी अवस्थेत साधना केली. नामदेवाने स्वप्नात दृष्टांत दिला आणि आयुष्याच्या वेलीला अभंगाची फुले लगडू लागली.

## प्रकरण : सात

### गुरूपदेश

ज्ञानदेवानी रेड्यास बोट लावलं आणि रेडा वेद म्हणू लागला. ज्ञानदेवांनी बोट काढून घेतलं, रेडा, रेडाच राहिला. म्हणजे रेड्यास ज्ञानदेवांचा स्पर्श महत्त्वाचा होता. असाच गुरूंचा स्पर्श मानवी जीवनात महत्त्वाचा असतो. हा स्पर्श कधी प्रत्यक्षात तर कधी अप्रत्यक्ष ! स्वप्नात येऊनही उपदेश केल्याचा उल्लेख संत साहित्यात आपणांस आढळतो.

संत नामदेवांच्या स्वप्नात ज्ञानेश्वर आले. शंभर कोटी अभंगाची पूर्तता कर असे सांगितले. त्या उपदेशाप्रमाणे नामदेव ग्रंथ रचना करू लागले. याकामी त्यांच्या घरातील चौदा माणसे, दासी जनाबाई हीसुद्धा ग्रंथरचना करीत होती.

असाच स्वप्न दृष्टान्त सन्त तुकारामास स्वप्नात दिल्याचा आपणास आढळतो. हा योग शके १५६१ गुरुवार, माघ महिन्यात आला. त्यादिवशी दशमी होती. महाराज निद्रीस्त होते. त्यावेळी स्वप्न पडले.

' संते गुरुराये कृपा मज केली । परी नाही घडली सेवा काही ।।
सांपडवीले वाटे जाता गंगा स्नाने । मस्तकी तो जाणा ठेविला करू ।।
भोजना मागती तूप पाऊशेर । पडीला विसर स्वप्ना माझी ।।
काही कळू दे उपजला अंतराये । म्हणवूनी काये त्वरा जाळी ।
राघो चैतन्य–केशव चैतन्य । सांगीतली षुण माळीकेची
बाबाजी आपले सांगीतले नाम । मंत्र दिल्हा रामकृष्ण हरी ।
माहो शुद्ध दसमी पाहोनी गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ।। ७ ।।

आपणांस स्वप्नात आपले गुरु बाबाजी चैतन्य यांनी दृष्टान्त दिला. पावशेर तूप मागितले पण ते आपण देऊ शकलो नाही याची त्यांना खत वाटते, दुःख होते.

यावरोबर आपली परंपराही त्यांनी सांगितली व राम कृष्ण हरी हा मंत्र जपासाठी दिला.

तुकारामांची गुरू परंपरा खालीलप्रमाणे आहे.

राघव चैतन्य
↓
केशव चैतन्य
↓
बाबाजी चैतन्य
↓
तुकाराम
↓
↓ निळोबाराय ↓ बहिणाई

## मंत्र–राम कृष्ण हरी

तुकारामांची एकाकी अवस्था संपली होती. संसाराचे पाश दूर झाले होते. त्यांना फक्त ओढ होती ती विठ्ठल भेटीची. यासाठी त्यांनी संताजवळ धरणे धरले. विठोबासी निरोप पाठविला. त्यांचे जगणे म्हणजे निव्वळ विठोबाचा ध्यास होता.

कन्या सासुऱ्यासी जाये ।
मागे परतोनी पाहें
तैसे झाले माझ्या जीवा ।
कधी भेटशी केशवा ?

असा विरहीणीचा धावा त्यानी सुरू केला. रात्रंदिवस विठोबाशिवाय चैन पडेना.

आम्ही बिघडलों, तुम्ही बिघडांना . . . .
परिसाच्या संगे लोह बिघडलें
लोह बिघडले नी सुवर्णची झाले.
चंदनाच्या संगे वृक्ष बिघडले;
वृक्ष बिघडले नी चंदनची झाले.
सागराच्या संगे गंगा बिघडली;
गंगा बिघडली नी सागरची झाली.
विठोबाच्या संगे तुका बिघडला;
तुका बिघडला नी विठ्ठलची झाला.

असे साऱ्यांचे व तुकोबांचे बिघडणे सुरू होते.

या साऱ्यातून साधत होती ती अद्वैत्त भूमिका. आपण आणि विठ्ठल दोन नाही तर एकच आहोत. ही जाणीव त्या पाठीमागे होती. या अद्वैतातून–राग, प्रेम, तिटकारा, चीड, सारे काही तुकारामाने व्यक्त केले आहे.

देवा, तू माझी माऊली,
तू माझी साऊली.

विठ्ठला, तू माझी आई आहेस. तू माझी सावली आहेस. चुकलेले लेकरू आईची जशी वाट पहाते तसे मी तुझी वाट पहात आहे. तू सत्वर ये आणि मला भेट दे !

म्हणून म्हटले आहे की, तुकारामाने अभंग लिहिले नाहीत; तर तुकाराम जगला आहे. रात्रन्दिवस त्याच्या मुखातून अभंगाशिवाय काहीच बाहेर पडत नव्हते.

तुकारामाची एकूण काव्यरचना चार हजार अभंगाची आहे. काही बनावट अभंगही आहेत. त्याकाळी त्याचे नाव घेऊन इतर काहींनी ते घुसडण्याचाही संभव आहे. 'तुका' या नावाचे इतर कवीही त्यावेळी असले पाहिजेत.

या सर्व अभंगाचा विचार करता त्यांत विविधता आहे. जिव्हाळा आहे. शेवटी मराठी भाषेतील पहिल्या भावकवीची ही उत्कट भावकविता होती असेच म्हटले पाहिजे.

## प्रकरण : आठ

## भावकवी तुकाराम

तुकारामाच्या एकूण अभंगाची संख्या अंदाजे चार हजार आहे. इतर अभंग हे आक्षेपार्ह असून त्याचे कवी इतर असले पाहिजेत. तुकारामाची कविता म्हणजे उत्कट अनुभूतीचा साक्षात्कार आहे. उतू जाणाऱ्या दुधावर कितीही पाणी ओतले तरी ते जसे उतू जाते, तसेच मनातील भावना आपोआप जेव्हा उतू जातात तेव्हाच कवितेचा जन्म होतो.

तुकाराम महाराजांची एकाकी अवस्था काय ? किंवा त्यांचा विठ्ठलमय होण्यापर्यंतचा प्रवास काय ? हे सारेच विठ्ठलमय आहे. या माणसाला निव्वळ विठ्ठलाचे ध्यान होते. दुसरे काहीच सुचत नव्हते. लौकिक संसार या माणसाने कधीच सोडला होता व विठ्ठलाचा संसार या माणसाने मांडला होता. तो संसार दृष्ट लागावी एवढा नेत्रसुखदायी आहे.

वारकरी संप्रदायात तुकारामांचा उल्लेख आदरार्थी केला गेला नाही. ज्ञानदेवांना आपण ' ते ' ज्ञानदेव असे म्हणतो पण तुकारामास मात्र 'तो' तुकाराम असे म्हणतो. तुकाराम वाचकांच्या जवळ येतो तोच मुळी एक मूल बनून. ज्ञानदेव येतात ते आभाळासारखे ! तुकारामाविषयी आपणांस जिव्हाळा वाटतो तर ज्ञानदेवाविषयी आदराची भावना होते.

आदर या शब्दामध्ये डर म्हणजे भिती आहे. ही भिती तुकारामाजवळ वाटत नाही.

घरात चुलीजवळ शेकत बसलेला, एक म्हातारा नजरेसमोर उभा राहतो. हा म्हातारा म्हणजे तुकाराम !

तुकारामाची कविता किंवा त्याचे अभंग घराघरात, चुलीपर्यंत पोहचले याला कोणते कारण असावे ? असा प्रश्न जेव्हा येतो तेव्हा त्यातील 'सुलभता' ही प्रामुख्याने जाणवते. सोपेपणा काळजास भिडतो. प्रसाद गुण अंतःकरणास जाणवतो. म्हणजे या माणसाची कविता आपणास समजून घ्यावी लागत नाही. ती आपोआप कळते. एवढे त्यातील सोपेपण आहे. मराठी भाषेत अडाणी माणसांच्याही मुखात नित्य असणारा, चुलीपर्यंन गेलेला हा एकमेव कवी आहे.

ज्ञानबा – तुका या नामघोषात सारे वारकरी भान हरपतात, खांद्यावर असणारा प्रसाद त्याचे ओझेही वाटत नाही. पाऊले चालती परतीची वाट तर पूर्वी पंढरीची वाट ही स्थिती असते. रामायण – महाभारतासारखे या दोघांचे नाव ओठात असते.

वारकरी संप्रदायाचा अखेरचा कुलगुरू म्हणजे तुकाराम होय. आता येथून पुढे या विद्यापीठात विद्यार्थी असतील. पण त्यांना पदव्या नसतील. नव्या युगाचे हे नवे भान स्वीकारायला मन तयारच होत नाही !

याला कारण तुकाराम आणि त्याची भाववृत्ती. या भाववृत्तीला पोषक असणारी मनोवृत्ती त्याच्याजवळ होती. समाजाला आपणास काही शिकवायचे आहे ही प्रौढ जाणीव त्यात नव्हती.

तुकाराम बोलत राहिला. जे जे बोलला ते ते अक्षर ठरले. म्हणून–

मंबाजीबुवा किंवा रामेश्वर यांनी तुकारामांची गाथा इंद्रायणीच्या पात्रात बुडविली असेल. पण त्या वह्या इंद्रायणीने तारल्या नाहीत. तर त्यातील भाषाच एवढी सोपी होती की, ती रचना लोकगंगेनेच तारली.

त्यावेळच्या समाजास त्याची अभंग-रचना पाठ होती. कीर्तनात ती येत होती. चौदा टाळकरी तिचा प्रसार करीत होते. त्यातील भावना सच्ची होती. त्यातले तत्त्वज्ञान रोखठोक होते. व्यवहारपण सरळ होते. कोणताही आडपडदा न ठेवता मुखातून आले तेच अभंग झाले.

काही ठिकाणी ग्राम्यपण जरूर आले. हे वैतागातून–तिरस्कारातून नव्हते; तर ढोंगीपण समाजास कळावे. हीच त्या पाठीमागे भूमिका होती. ती भूमिका एका साधु–संताची–विठ्ठलमयी माणसाची होती.

तुकारामाच्या अभंगाचा हा प्रवास विश्वातून–विश्वात्मकतेकडे होता. एक संसारी माणूस ते एक विठ्ठलदायी व्यक्तिमत्त्व इतपर्यंत हा प्रवास आहे.

स्वप्नातही न पाहिलेला विठ्ठलाविषयी तळमळ आहे, तू भेटलास तर मी तुझ्याशी बोलेन हे भाबडेपण आहे, अंतःकरणाची तळमळ आहे. रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग याची जाणीव आहे, स्वतःचे गुण–अवगुण याची जाणीव आहे. माझे

पाप देवाच्या दर्शनाच्या आड येते ही भीती आहे, नम्रता आहे. एकांतापेक्षा देव संताच्या सहवासात भेटेल याची खात्री आहे.

आणि–

देव भेटल्यावर, मी धन्य झालो असे आनंदाचे उद्‌गार आहेत. कीर्तन हाच साक्षात्काराचा मार्ग आहे, याची प्रचिती आलेली आहे. भक्तीशिवाय ईश्वरप्राप्ती नाही हेही कळून चुकले आहे.

विष्णूमय जग ।
वैष्णवांचा धर्म
भेदाभेद अमंगळ ।।

हे विश्वव्यापी वचन आहे.

तात्पर्याने–

१) तुकारम हा भावकवी होता हे पुढील सर्व विवेचनावरून लक्षात येईल.

२) त्यातील सोपेपण मनांस भिडेल.

३) त्याचा व्यवहारीपणा, हजरजबाबीवृत्ती जाणवत राहील.

४) त्याचे संप्रदायातील ‘ कळसपण ’ डोळस स्वरूपात दिसेल.

यासाठी त्याच्या अभंगाचे स्वरूप समजून घेणे आवश्यक वाटते.

## प्रकरण : नऊ

## अभंगांचे वर्गीकरण

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंगाची संख्या चार हजार मिळते. त्याचबरोबर त्यांचे काही क्षेपक अभंग आहेत. साडे तीनशे वर्षे झाली तरी या अभंगांतील ताजेपणा अजूनही कायम आहे.

अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने त्यांच्या अभंगाची खालीलप्रमाणे वर्गवारी केली आहे.

१) तुकाराम महाराजांची साधक अवस्था. २) त्यांची सिद्ध अवस्था. ३) संतविषयक. ४) पंढरी महात्म्य. ५) नाम संकीर्तन. ६) नाटाचे अभंग. ७) गौळणी ८) बालक्रीडा ९) उपदेश १०) ढोंगी लोकांवर टीका ११) इतर.

तुकाराम महाराजांनी परमार्थाच्या वाटा सोप्या करून ठेवल्या आहेत. त्यानी त्या डोळसपणे निरखल्या होत्या. त्यातील खाणाखुणा त्यांच्या पक्क्या ओळखीच्या झाल्या होत्या. त्यातूनच अभंगात सोपेपण आले. त्यामुळे कर्म, ज्ञान, भक्ती, कोणत्याही गोष्टीविषयी बोलणे असू दे. त्यात शब्दाचे अवडंबर आले नाही. खोटे तत्त्वज्ञान आले नाही. त्यात सोपेपणच आले. खोटे पांडित्य त्यांनी कोठेही मांडले नाही. व्यवहारातील दाखले, दृष्टान्त देत ते बोलत राहिले. त्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान सहजी पचनी पडले.

आम्हां घरी धन शब्दांचीच रत्नें,
शब्दांचिच शस्त्रें यत्नें करू ।।
शब्दची आमुच्या जीवांचे जीवन
शब्दे वाटू धन, जन लोकां–

आम्ही भिकारी मुळीच नाही. तुमचें लौकिक धन आमच्याजवळ नसेल, पण आमचे शब्द हेच रत्नमोलाचे आहेत. तीच आमची रत्ने आहेत. शब्द आमच्या जीवांचे जीवन आहे व त्यायोगे आम्ही लोकांना ज्ञान वाटत असतो. शब्द हा आमचा देव असून, आम्ही शब्दांनीच त्यांची पूजा करतो.

आपल्या शब्दांवर तुकोबाचा विश्वास होता. त्याची ताकद त्यानी ओळखली होती. पण हे शब्द ईश्वरामुळे आपणास मिळतात ही कबूलीही होती.

## १) सगुणभक्ती

वारकरी संप्रदायाला निर्गुण भक्ती मान्य नव्हती. म्हणून तुकारामांच्या सगुण भक्तीपर अभंगाचा आपणांस विचार करावा लागतो.

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी ।
कर कटावरी ठेवोनिया ।
तुळशी हार गळां कासे पीतांबर ।
आवडे निरंतर, हेची ध्यान ॥ १ ॥
मकर कुंडले, तळपती श्रवणी ।
कंठी कौस्तुभ मनी विराजीत ।
तुका म्हणे माझे हेची सर्वसुख ।
पाहीन श्रीमुख आवडीने ॥ २ ॥

कमरेवर हात ठेवून, अठ्ठाविस युगे विटेवर उभे असणारे ते सावळे रूपडे माझे आवडते आहे. त्याच्या गळ्यात तुळशीची माळ आहे. कमरेला तो पीतांबर नेसला आहे. त्याच्या कानात मकरकुंडले आहेत. गळ्यात कौस्तुभमणी आहे. हे रूप मी मोठ्या आवडीने पहातो.

राजस, सुकुमार मदनाचा पुतळा म्हणजे माझा विठ्ठल आहे. त्याच्या तेजापुढे चंद्रसूर्याचे तेज फिके पडते. कपाळाला त्याने कस्तुरीचा मळवट भरला आहे. डोक्यावर मुकूट तर कानांत कुंडले आहेत. कमरेला जरीकाठी पीतांबर आहे. अंगावर शेला धारण केला आहे. त्याची अंगकांती मेघाप्रमाणे श्यामल आहे.

रूदो डोळे जडो तुझी मूर्ती
रखुमाईच्या पती सोयरिया

हे रुक्मिणीचे पती, विठाई माऊली, माझे डोळे नित्य तुझ्या मूर्तीकडे जडू देत. तुझे रूप गोड आहे. त्यातून, ते गाईल्यानंतर मला प्रेमच मिळते. भक्तीचा ठेवा मिळतो.

म्हणून, हे विठ्ठलाई तू माझ्या हृदयांत नित्य रहा. तुझा संचार असू दे. मी यापेक्षा दुसरे काहीच मागत नाही.

गरुडावर आरुढ झालेली, पीतांबर नेसलेली तुझी मूर्ती माझ्या नजरेस केव्हा बरे दिसेल ? हे रूप उत्तमातले उत्तम आहे. वैजयंती माळ गळ्यात आहे. कमरेवरती हात आहेत. असे हे रुप माझ्या डोळ्यासमोर वारंवार येते. पण ते प्रत्यक्षात कधी दिसेल ? माझी प्रकृती क्षीण होत चालली आहे. तो ध्यास खरा ठरावा.

तुकारामाने विठ्ठलाचे सावळे रुप सगुण अवस्थेत पाहिले आहे. त्या मूर्तीचा त्याला ध्यास लागला आहे. सगुण अभंगात त्याने ' विठ्ठल कसा ? ' ते व्यक्त केले आहे.

## २) मी अभंग लिहीत नाही !

' तुकाराम अभंग लिहीत नव्हता. तर तो अभंग होता. चालता चालता तो अभंगच बोलत होता. वेलीवर फूल येणे हे सहजधर्म आहे. तसे त्याच्या मुखातून आपोआप अभंग जन्म घेत होते. शब्द हे शस्त्र आहे याची त्याला जाणीव होती. म्हणून मोठ्या लीनतेने तो मी अभंग लिहीत नाही असे म्हणतो.

' आपुलिया बळें नाही मी बोलत ।
सखा कृपावंत वाचा त्याची ॥१॥
साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी ।
शिकविता धनी वेगळाची ॥२॥
काय म्यां पामरे बोलावी उत्तरे
परित्या विश्वंभरे बोलविले ॥३॥
तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा ।
वाजवी पांगळा पायाविण ॥४॥

मी जे बोलतो आहे ते शब्द माझे नाहीत. माझ्या मुखातून प्रत्यक्ष विश्वंभरच बोलतो आहे.

हे शब्द माझे नाहीत हे तुम्ही निश्चयाने जाणा. मी शब्दांचा हमाल आहे. विठोबाचा मजूर आहे. माझी लाज, अब्रू त्या विठ्ठलाने राखली आहे. त्याच्यामुळे मी निशंःक झालो आहे. त्याच्या स्मरणाने माझी वाणी गोड झाली आहे.

एव्हढी विनवणी करून महाराज थांबत नाहीत. तर ते सर्व श्रोत्यांच्या पायावर मस्तक टेकवतात. जे जे चांगले ते ते पारखून घ्या असे विनवतात. हा माल माझ्या मालकाचा असून मी फक्त त्याचा हमाल आहे.

संताची उच्छिष्टे बोलतो उत्तरें ।
काय म्यां गव्हारें जामावे हे ॥ १ ॥
विठ्ठलाचें नाम घेता नचे शुद्ध
तेथे मग बोध काय कळे ॥ २ ॥

तुकाराम आपल्या अडाणीपणाची सहज कल्पना देतो. तेथे तो कोठलीही लपवाछपवी करत नाही. मी निव्वळ गावरान माणूस आहे. विठ्ठलाचे नावही मी निट घेवू शकत नाही. ' माझ्या मुखें हरी बोलवितो ' मी फक्त एक साधन आहे.

वेदांचा खरा अर्थ कोणता ? तो आम्हालाच माहित आहे. इतरांनी फक्त भारच वहायचा आहे. पदार्थाची गोडी चाखून कळत असते. भार वाहून कळत नसते. ' विठ्ठल अनुभवावा ' हेच सरळ साधे तत्त्वज्ञान, महाराज किती सोपे करून सांगतात.

मी विठ्ठलाकडे भीक मागीतलेली आहे. म्हणूनच मी बोलू शकतो.

तात्पर्याने मी जे बोलतो आहे. ते शब्द माझे नाहीत. मी फक्त मजूर आहे व माझ्या मुखातून हरी बोलतो आहे.

आधुनिक युगात काव्यांची निर्मिती कारणे कोणती ? असा आपण नेहमी विचार करत असतो. तुकाराम महाराज आपल्या काव्याचे प्रयोजन, आणि काव्यनिर्मितीचे जनक कारण सहज स्पष्ट करतात.

' काय म्यां पामरे, बोलावी उत्तरें
बोलविता धनी । वेगळाची ।। धृ ।।

माझे काव्य कसे निर्माण होते ? ते मला कळत नाही. माझ्या मुखातून प्रत्यक्ष पांडुरंग बोलत असतो.

## ३) चरित्रात्मक अभंग !

साधुसंताच्या अभंगातून किंवा रचनेतून त्यांचे चरित्र सापडते. लेखक आणि कलाकृती या दोन गोष्टी आपणांस वेगळ्या करता येत नाहीत. किंबहुना साहित्य हेच लेखकाच्या जीवनाचे प्रतिबिब असते. तुकारामाचे चरित्र हे त्याच्या रचनेतून आपणांस सापडते. ते चरित्रात्मक अभंग वाचत असताना. त्यांना झालेला त्रास, दुष्काळ, आई–वडील, पहिली बायको, दुसरी बायको या साऱ्यांचा तपशील त्यांच्या या अभंगातून मिळतो.

महिपतीबुवा ताहराबादपूरकर यांनी दिलेल्या चरित्रांपेक्षा खूपच वेगळी माहिती तुकारामांच्या या अभंगातून आपणांस मिळते.

साधारणपणे तुकारामांस ४२ वर्षे आयुष्य मिळाले असे मानता येईल. यापैकी पहिली १७ वर्षे ही संसार–दुष्काळ–बालपण अशी व्यतीत झाली. नंतर तुकारामाची एकाकी साधना अवस्था सुरू होते. नंतर तो विठ्ठलमयच झाला आहे.

या चरित्रात्मक अभंगातून तुकारामाचा जीवनपट आपणांसमोर उलगडत जातो. आपल्या कुळाविषयी बोलताना तो म्हणतो.

शूद्रवंशी जन्मलो । म्हणोनी दंभे मोकलीलों
अरे तूची माझा आता । मायबापा पंढरीनाथा ।।१।।

वेदविद्या, पठण व शिक्षण हे त्या काळात ब्राह्मणांचे अधिकार होते. इतर ज्ञातींना तो अधिकार नव्हता. एक साधा शेतकरी, कुणबी ग्रंथरचना करतो हेच मुळी त्या काळच्या ब्राह्मण वर्गास न आवडणारे होते. यातून त्याला त्रास झाला. त्यामुळे तुकारामाची वाणी थोडी चिडखोर होती.

'माझा जन्म शूद्रवंशात झाला. मी कुणबी म्हणून जन्मास आलो. त्यामुळे इतर लोक मला त्रास देतात. त्यात गावचा पाटीलही होता. तेव्हा विठ्ठला तूच माझा आता मायबाप आहेस. कळत नव्हते, संसाराची काळजी नव्हती, या वयात माझा बाप मरण पावला.

बाप गेला न कळता ।
नव्हती संसाराची चिंता ।
विठो तुझे माझे राज्य
नाही इतरांचे काज ।। १ ।।
बाईल मेली, मुक्त झाली,
देवे माया सोडविली ।। २ ।।
पोर मेले बरे झाले
देवे माया विरहीत केले ।। ३ ।।
माता मेली, मज देखता
तुका म्हणे हरली चिंता ।। ४ ।।

आई, वडील, मूल, पत्नी हे वारल्यामुळे आपण संसारातून मुक्तच झालो. जगाने माझी निंदा करावी हे माझ्या नशिबातच आहे. चांगली परीक्षा होवून, त्याप्रमाणे मला त्याचे फळ मिळाले आहे. संसारातून मला सर्वांनी टाकून दिले आहे. घरची–बायका पोरं माझी निंदा करतात. लहानथोर सर्वजणच माझा डांगोरा पिटत असतात. लौकिक व्यवहारात मी नागविले आहे. त्यामुळे मला कोणी दारात उभे करत नाही. माझे जसे संचित असेल तेच माझ्या वाट्यास आले आहे. ते स्वीकारणे हेच माझे काम आहे.

संसाराच्या नात्याने मी देवा नाचलो आहे. तुझ्या पायांची म्हणून मी वारंवार आठवण करतो आहे. माझे आई, पांडुरंगे, सत्वर तू माझ्याकडे ये.

याती शूद्र वैश्य केला वेवसाय ।
आदि तो हा देव कुळपूज्य ।। १ ।।
नये बोलों परी पाळीले वचन
केलीयाचा प्रश्न तुम्ही संती ।। २ ।।

माझी याती शूद्र आहे. वाण्याचा माझा व्यवसाय आहे. तुम्ही संतानी आज्ञा केली म्हणून मी तुमचे हे वचन पाळीत आहे. दुष्काळात द्रव्य गेले, नातेवाईक मरून गेले, या दु:खाने आता माझी मलाच लाज वाटू लागली आहे.

देवाचे देऊळ भंगले होते ते नीट करावे असे माझ्या मनांत आले. आरंभी एखादे दिवशी कथा-कीर्तन करीत होतो. कीर्तनकारांच्या पाठी उभे राहून धृपद धरीत होतो.

शरीर कष्टविले. संतांचे ऐकले. स्वप्नात गुरूंनी उपदेश केला.

‘ मानीयेला स्वप्नी गुरूचा उपदेश ।
धरियला विश्वास दृढ नामी ।। ’

यातूनच कवित्वाची स्फूर्ती झाली. माझ्या कवित्वाचा निषेध झाला. त्यातून अपमान सहन करावा लागला. माझ्या कवितेच्या वह्या इंद्रायणीत बुडविल्या. त्या नारायणाने तारल्या. माझे समाधान केले.

ऐका वचन हे संत ।
मी तो आगळा पतित ।।
काय काजे प्रीत ।
करींतसे आदरें ।।

मी शेतीकाम केले आहे. गुरांच्या शेपट्या ओढल्या आहेत. जे द्रव्य होते ते दुष्काळात संपून गेले आहे. घरचा संबंध तोडल्यामुळे करंटा ठरलो आहे. आता मला लोकांना तोंड दाखविता येत नाही. वडीलांपासून पंढरीची वारी घरी होती. विठ्ठलाची सेवा चालत आली होती. तीच आता करणार आहे.

बरें झाले देवा, निघाले दिवाळे
बरी या दुष्काळे पीडा केली.

माझ्या दुकानाचे दिवाळे निघाले ते सुद्धा बरे झाले. दुष्काळ पडला, पोटचे पोर आन्नावाचून मेले, मी पूर्णपणे नागवला गेलो. ते सुद्धा बरे झाले. कारण विठ्ठलाई, तुझे पाय मला त्यामुळे दिसले.

आता काय खावे, कोणाकडे जावे ।
गावांत रहावे कोण्या बळे ।। १ ।।
कोपला पाटील, गांवचे हे लोक ।
आता मज भीक कोणी घाली ।। २ ।।
आता येणे चवी सांडविली ।
निवाडा करिता दिवाणांत ।। ३ ।।
भल्या लोकांपासी सांगितली जात ।
केला माझा घात दुर्बलाचा ।। ४ ।।

तुका म्हणें यांचा संग नव्हे मला ।
शोधीत विठ्ठला जाऊ आता ॥ ५ ॥

आता काय खावे, कोणाकडे जावे, गांवात तरी कोणत्या आधारावर रहावे ? गांवचा पाटील आणि लोक माझ्यावर रागावले आहेत. आता मला कोण भीक घालील ? आता तुकारामाने सर्व गोडी टाकली असे म्हणतात. ' मी वेडा आहे ' असा त्यानी निवाडा केला आहे, भल्या लोकाना गाठून मी गाऱ्हाणे मांडले, पण या दुर्बलांचा त्यानी घात केला. म्हणून म्हणतो ' यांचा संग बरोबर नाही. विठ्ठलाचा शोध घेत आपण जावू या '.

तुकारामाच्या या चरित्रपर अभंगातून त्याला संसाराविषयी असणारी आसक्ती पूर्णपणे सुटली आहे. देवाविषयी त्याला आकर्षण वाढले आहे.

मानवीं जीवनांत जी गोष्ट आपणास साध्य करायची आहे ती गोष्ट पूर्ण निसंःग झाल्याशिवाय मिळत नाही. त्या गोष्टीचा ध्यास घेतल्याशिवाय मिळत नाही. स्वतःला पूर्ण विसरून त्याच गोष्टीचे ममत्व धरणे हे यासाठी आवश्यक आहे.

तुकारामाने असा संसाराचा त्याग केला आहे. परिस्थितीमुळे त्यास तो करावा लागला, यातून जागी झाली ती त्याची विरक्त वृत्ती. या विरक्त वृत्तीतून नाहीशी झाली आसक्ती. म्हणजे सर्वनाश म्हणून.

आसक्ती
↓
निवृत्ती
↓
भक्ती
↓
प्रीती
↓
विरक्ती

असा हा पूर्णत्वास नेणारा प्रवास असतो. तुकारामाने या मार्गाने जीवनाचा प्रवास केला. म्हणून तो विठ्ठलच झाला.

## ४) काही प्रासंगिक अभंग !

साधुसंताच्या निष्ठा समाज तपासून घेत असतो. ईश्वर पहात असतो. यातून काहीं प्रसंग त्याच्या आयुष्यात येतात. त्या प्रसंगात त्याची चित्तवृत्ती ढळते की, तो अढळ रहातो हे पाहिले जाते व हे बावन्नकशी सोने पूर्णपणे तावून–सुलाखून घेतले जाते. त्याचवेळी तो माणूस संतत्व या पदवीस पात्र होतो.

असे काही प्रसंग तुकारामाच्या जीवनांत आले आहेत. त्या प्रसंगाच्यामागे मोह आहे. या मोहात तो गुंतून पडलेला नाही. त्याची चित्तवृत्ती ढळलेली नाही. त्यामुळे त्याच्या साधुत्वास उजाळाच प्राप्त झालेला आहे.

१) विषयाचे सुख मिळावे म्हणून एक स्त्री तुकारामाकडे आली. त्यावेळी तिची समजावणी करताना तुकाराम महाराज म्हणतात,

"पराविया नारी रखुमाईसमान ।<br>
हे गेले नेमून ठायीचेची ॥१॥<br>
जाई वो तू मातें न करी सायास ।<br>
आम्ही विष्णूदास नव्हो तैसे ॥२॥<br>
न सहावे मज तुझे हे पतन ।<br>
नको हे वचन दुष्ट वदो ॥३॥<br>
तुका म्हणे तुज पाहिजे भ्रतार ।<br>
तरी कां इतर लोक थोडे ? ॥४॥

परस्त्री आम्हास आईसारखी आहे. आम्हा साधूसंताचे हे वचन ठरून गेलेले आहे. म्हणून हे माते तू जा ! आम्ही विष्णूदास तसे नाही.

तुझे हे पापी वर्तन, तुझे हे पतन मला साहवत नाही. तेंव्हा तू जा !

हे नारायणा, स्त्रियांचा संग भला नव्हे ! लाकडाच्या, मातीच्या, दगडी स्त्री पुतळयांचाही मला मोह पडू देवू नकोस, त्यामुळे तुझी आठवण येत नाही. तुझे भजन घडत नाही. एकदा स्त्रीयांकडे मन लालचावले तर आवरता–आवरत नाही साधूने अग्नीचे रुप धारण केले तर त्या पासून भाजणार नाही काय ? तसा स्त्रियांचा संग असतो.

तुकारामाच्या आयुष्यातील या एका गोष्टीने त्याचे चारित्र्य स्पष्ट होते.

## ५) तुकाराम–जिजाई– एक संवाद !

**जिजाई** : दाणे भरून गोणी घरात आली तर माझा नवरा ते मुलांना खावू देत नाही. हा मेला बाहेरच्या लोकांची पोटे भरत असतो. असा चोरटा आहे.

**महाराज** : मी लोकांना धान्य देवू लागलो तर ही राक्षशीण पिसाळते. हाताला झोंबत असते. हा सर्व खोटया संचिताचा साठा आहे.

**जिजाई** : माझा नवरा देववेडा झाला आहे. पोरानो मी तुम्हास काय खायाला देवू ? त्याने गळयात माळा घातल्या आहेत. तो देववेडा झाला आहे.

आमची त्यास काळजी नाही. त्याने स्वत:च्या पोटाची व्यवस्था केली. हातात टाळ घेऊन तो देवळात जातो. रात्रं दिवस टाळ कुटत बसतो, गात रहातो. हा घरात थांबत नाही. तेव्हा आम्ही करावे तरी काय ?

**महाराज** : मी अजून नाहीसा झालो नाही. तोवर तरी धीर धर !

**जिजाई** :
बरे झाले गेले ।
आजी अवघे मिळाले ।। १ ।।
आता खाईन पोटभरी ।
ओल्या कोरड्या भाकरी ।। २ ।।
किती तरी तोंड
यांसी वाजवू मी रांड ।। ३ ।।

**तुकाराम** :
तुका बाईले मानवला ।
छि: थू करोनिया बोलला ।। ४ ।।

ही अशी बोलते, पण मला त्याची संवय झाली आहे.

अशा तऱ्हेने या पती पत्नीत वारंवार संवाद घडत असले पाहिजेत. कितीतरी अभंगरूपी धन असे वाहून गेले आहे. त्यामुळे मराठी सारस्वत थोर साहित्यास मुकले आहे. तुकारामांचे अभंग कितीतरी न लिहिता गेले असले पाहिजेत.

## ६) गुरुपदेशाचा प्रसंग

तुकारामाना स्वप्नात गुरुपदेश झाला. याचा उल्लेख पूर्वी केलाच आहे. असे उपदेश साधूसंताना होत होते याचे दाखले आपणास नामदेवांच्या स्वप्नात ज्ञानदेव आले होते या प्रसंगातून मिळतोच. गंगास्नानासाठी तुकाराम बाहेर पडले. रस्त्यात बाबाजी चैतन्य या त्यांच्या गुरुंची त्यांना भेट झाली. त्यानी आपली परंपरा सांगितली. डोक्यावर हात ठेवला आणि पावशेर तूप मागितले. आपण गुरुंची सेवा करू शकलो नाही याचे त्याना दु:ख वाटते.

तो दिवस माघ शुद्ध दशमी गुरुवार असा होता.

## ७) शिवाजी महाराजानी नजराणा पाठविला अन्

देहू या ठिकाणी तुकारामबुवा गोसावी नावाचे संत पुरुष आहेत ही वार्ता शिवरायांच्या कानावर गेली. त्यावेळी महाराजानी मोठ्या आदरपूर्वक त्यांना नजराणा पाठविला. त्यावेळी महाराजांचे कीर्तन लोहगावी सुरू होते.

महाराजानी दिवट्या, छत्री, घोडें वगैरे नजराणा पाठविला. तो घेणे बरे नाही असे त्याना वाटले. पंढरीराया, यात मला कशास गुंतवितोस ? असा विचार मनात आला.

मान, दंभ, या गोष्टी डुकराच्या विष्टेप्रमाणे मी मानतो. माझ्या चित्ताला जे आवडत नाही तेच तू पुरवतो आहेत. एकान्तात रहावे कोणाशी बोलू नये असे मला वाटते. पंढरीनाथा, तू माझ्या पाठीमागे का बरे लागला आहेस ?

लोक, धन, शरीर या गोष्टी मी ओकारीप्रमाणे मानतो. पण पांडुरंगा तुला फार वाईट खोड लागली आहे.

सोने आणि माती ।
आम्हां समान हे चित्ती ॥१॥
तुका म्हणे आले ।
घरां वैकुंठ सावळे ॥२॥

आम्हा साधुसंताना सोने-माती एकच वाटते. यापेक्षा तुझी कृपा आम्हांस मोठी आहे. तुझ्या कृपेने वांझ गाय दूध देते. चातकास पावसाचा एक थेंब पुरा असतो. म्हणून असे देण्यापेक्षा तू कृपा कर.

## ८) पाईकांचे अभंग

या प्रसंगातून तुकाराम महाराजानी शिवाजी राजास उपदेश केला. त्यास पाईकांचे अभंग असे म्हणतात.

वरील प्रसंगास उद्देशून जी अभंगाची रचना झाली. त्याचा समावेश आपणास या सदरात करावा लागेल.

## ९) रामेश्वर भटास उपदेश

रामेश्वर भटानी तुकाराम हा शूद्र आहे. कवित्व करतो म्हणून त्याच्या अभंगाच्या वह्या इंद्रायणीच्या डोहात बुडविल्या. पण त्याचवेळी त्याच्या अंगाचा दाह होऊ लागला पुढे महाराजांचा तो शिष्य झाला. पण यावेळी त्यास केलेला उपदेश पुढीलप्रमाणे-

' चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती ।
व्याघ्रही न खाती सर्प तया ॥ १ ॥
विष तें अमृत आघात ते हीत ।
अकर्तव्य नित् होय त्यासी ॥ २ ॥

चित्त शुद्ध असले म्हणजे शत्रूसुद्धा मित्र होतात. वाघ त्याला खात नाही. सर्प दंश करत नाही. विष घेतले तरी त्याचे अमृत होते. अग्नीच्या ज्वाला शितल भासतात. हे सर्व ईशकृपेने होते.

## १०) दुष्टानी छळ केला

तुकारामांचा छळ अनेक प्रकाराने अनेक लोक करीत होते. मंबाजीबुवा, रामेश्वरभट, गांवचा पाटील ही माणसे अग्रणी होती. एकदा तापलेले पाणी त्यांच्या अंगावर ओतले. आपले शरीर जळत आहे असे त्यांना वाटले. अशावेळी पांडुरंगास ते म्हणतात,

तुका म्हणें माझी तू होसी जननीं
आणीक निर्वाणी कोण राखे ॥

## पंजाबी गोसाव्याने मारले तेव्हा !

हे विठोबा तू माझा अंत पहातो आहेस. माझी सहनशीलता पारखतो आहेस. पंजाबीकडून मला काठ्यांनी मारलेस. एकाअर्थी हे बरे झाले. त्यामुळे निदान तुझे नांव तरी माझ्या मुखात आले. मला राग येवू दिला नाहीस. तोंडात शिवीगाळी येवू दिली नाहीस. एकाअर्थी तू मला वाचविलेस.

## ११) कवितेचा निषेध

तुकाराम कवित्व करतो हे त्यावेळच्या समाजात आवडण्यासारखे नव्हते. त्यावेळी कविता करणे ही एकाच वर्गाची मिरासदारी होती. तुकारामासारखा एक अनपढ काव्यलेखन करतो, देवावर अभंग लिहीतो म्हणून त्यांची गाथा इंद्रायणीत बुडविली. पण त्याच्या मनांतील काव्याचा झरा मुळीच आटला नाही.

करू कवित्व काय नाही आता लाज ।
मज भक्तराज हंसतील ॥१॥
आता आला एक निवाड्याचा दिस ।
सत्याविन रस विरसला ॥२॥

श्रेष्ठ लोक मला हसतात. मग मी कविता कशासाठी करू ? निवाड्याचा दिवस आला आहे. त्यासाठी सत्य तेच मी कवितेत मांडले आहे. जर काव्यात सत्य नसेल तर ते काव्य निरस होते.

तुम्हीही माझ्या बोलण्याकडे लक्ष देत नाही. मग व्यर्थ मी फोल कशास निवडत बसू ? असे म्हणत असले तरी अभंगाची रचना करणे हा त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग होता.

तात्पर्याने तुकाराम महाराजांच्या जीवनात जे लहान मोठे प्रसंग घडले त्याप्रसंगाच्या अनुभूतीतून त्याना कवित्व अधिकच प्रसवले आहे. प्रसंगास जीवंतपणा प्राप्त झाला आहे.

## १२) तुकारामाच्या भूपाळ्या

साधकास नेहमीच भूपाळ्या व हरिपाठाचे अभंग प्रिय वाटत आले आहेत. या भूपाळ्यात नामस्मरण आहे. विठ्ठलाची चरणसेवा आहे. त्यामुळे दिवसभर होणारा शिणभाग आपोआप नाहीसा होत असतो. वारकरी संप्रदाय मुळी हे तत्त्वज्ञान मान्य करतो की, आपण दिवसभर जी कामे करणार आहोत ती कामे पांडुरंगास साक्षी ठेवूनच आपण करीत आहोत.

माझे चित्त तुझे पायी ।
राही ऐसे करी कांही ॥
धरोनिया बाही ।
भव हा तारी दातारा ॥ १ ॥

माझे चित्त नेहमी तुझ्या पायाजवळ राहील. त्याकडे दृष्टी ठेवून मी हा भवसागर तरणार आहे. नामदेवाने पंढरपूरी पायाची पायरी होणे पसंत केले. तसेच हे दातारा, मी तुझ्या पायाचे दर्शन मागतो असे महाराज म्हणतात.

विठ्ठला, खरे तर तुला हे कळते. मी ते बोलून दाखवावे असे नाही. तुम्ही मला ज्या स्थितीत ठेवाल. त्या स्थितीत मी आनंदाने राहीन. माझे मन पांगळे झाले आहे. त्याग, भोग, दु:ख यापैकी कशाचा त्याग करावा ? मलाच कळत नाही.

वैराग्य प्राप्तीपूर्वी आणि नंतर तुकारामांची तळमळ आपणास जाणवत रहाते.

जळावेगळी मासोळी ।
तैसा तुका तळमळी ।। १ ।।

ही तळमळ अंतर्यामापासून होती. मासोळीची अवस्था त्या पाठी होती. हे भूपाळघांबरोर सर्व अभंगातून जाणवत राहते.

## १३) अद्वैत भक्ती

वारकरी संप्रदाय सगुण भक्तीबरोबर अद्वैत भक्ती मानतो. विठ्ठल हा आपल्यापेक्षा वेगळा नाही. दिव्याची ज्योत जशी अभिन्न करता येत नाही. माणसांपासून त्याची सावली दूर करता येत नाही. तशीच आमची भक्ती आहे.

विठ्ठल हा आमची आई आहे. आम्ही त्यांचे बालक आहोत. असे तुकाराम महाराज म्हणतात.

देवा, तू माझी माऊली
तू माझी साऊली
पाहता वाटुली, ।। १ ।।
पांडुरंगे ।।
तू मज एकला, वडील धाकुला ।
तू मज आपुला सोयरा, जीव ।। २ ।।
तुका म्हणे जीव तुजपाशी असे
तुझीयाने ओस सर्व दिशा ।। ३ ।।

आम्ही तुझी लहान लडीवाळ लेकरे आहोत. सलगीने बोलतो आहोत. देवा; बोलो नये ते बोलून गेलो आहे. पण तुम्ही ते आता सहन केले पाहिजे. आवडत्या लेकरास माय लाडाने खेळवते त्याचे हट्ट पुरे करते. तसे तुम्ही माझे हट्ट पूरे करा.

बालक आईजवळ हट्ट करते. त्याचे हट्ट पुरवावेत, हे त्यांच्या आईस समजते. तुला का बरे ते समजत नाही ? आईचे चित्त बालक व्यापून टाकत असते. तसे तुझे मन मी पूर्ण व्यापून टाकीले आहे.



३२९४ १२५७७२ नोंद २०/१२/८९

विठाई, पांडुरंगा, विठ्ठला अशा अनेक नांवाने, अनेक नांत्याने तुकाराम देवास बोलवित आहे. यामध्ये त्याच्या अंत:करणाचा बालभावच स्पष्ट होतो.

## देवांशी मागणे

तुकाराम महाराज विविध भूमिकेने श्रीहरीची भक्ती करतात हे आपणास जाणवत राहते. आपला हा जन्म म्हणजे, पुनर्जन्म आहे. त्यामुळे आता या जन्मात मी पूर्ण निर्भय होऊन तुझी भक्ती करतो आहे. आता या जन्मी तुझी सेवा करताना काही उणें पुरे झाले तर त्याचा दोष माझ्याकडे आहे पण ओझे मात्र तुझ्याकडे आहे.

जेथें जातो तेथें
तू माझा सांगाती ।
चालविसी हाती ।
धरोनिया ।। १ ।।

देवा, तूं माझी आई आहेस. सांगाती–सोबती आहेस. मी जेथे जेथे जातो तेथे तेथे तू मला बोट धरून घेऊन जात असतोस.

काया वाचा मन ठेविले गहाण
घेतले तुझे रिण जोडीलागी ।।

आम्ही जन्माचे कर्जबाजारी आहोत. तुझे रिण काढून आम्ही सण करतो. तुझ्याखेरीज सर्व काही खोटे वाटते. आमच्या गावचे येथे कोणी दिसत नाही. मी एकटा किती दिवस येथे राहू ?

आम्ही जे बोलतो ते तुला ठाऊक आहे. आपण नेहमीच एकत्र खेळत असतो.

मी जी बडबड करतो, ती चक्रपाणी तुझ्यासाठी आहे. लोकांना माहित आहे मी वेडा आहे. पण तुला माहित आहे ना ? मी तुझे लेकरू असून वेडा नाही ते !

दातारा, या संसारात कांहीच पुरे पडत नाहीं. माझी स्थिती माकडासारखी झाली आहे. या जन्मी तरी तू माझा अव्हेर करू नकोस. आता माझा सर्व भार तुझ्यावर आहे. मी लोकांच्या शिव्या खातो, त्या मला मिळतच नाही. त्या शिव्या तुलाच असतात.

मी फक्त तुझ्या पायाचे दर्शन मागतो आहे. देवाचे आईपण हे तुकारामास प्रिय आहे. आई आणि मूल हे असे नाते असते की त्यापुढे जगातील सर्व सुखे तुच्छ असतात. म्हणून देवा, तू माझा सांभाळ कर ? असे महाराज विनवतात.

## १५) पत्रिकेचे अभंग

संत वाङमयातील पत्रिकेच्या अभंगाचा सविस्तर विचार मराठी भाषेत व्हायला पाहिजे. तो अजून कुणी केल्याचे आढळत नाही. साधूसंतानी विठ्ठल जेव्हा

भेटत नाही त्यावेळी आपल्या रचनेतून जी आळवणी केली आहे, विठ्ठलाला जो निरोप धाडला आहे त्याचा समावेश आपणास या प्रकारात करावा लागेल.

पांडुरंगाच्या दरबारात विनवणी करणारी–

'दीन पतित अन्यायी
शरण आले विठाबाई'

असे म्हणणारी कान्होपात्रा हा उत्तम नमुना आहे.

पांडुरंग आपणास भेटत नाही म्हणून सुरवातीस वारकऱ्यांबरोबर तुकाराम निरोप देतो. अखेरची मागणी कळवतो पण ते घडत नाही. घडले नाही हे ध्यानांत आल्याबरोबर त्याने विठ्ठलास हे पत्र लिहिले आहे.

हेचि दान देगा देवा,
तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥
गुण गाईन आवडी ।
हेचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥
नलगे मुक्ती आणि संपदा ।
संत संग घेई सदा ॥ ३ ॥
तुका म्हणे गर्भवासी ।
सुखे घालावे आम्हासी ॥ ४ ॥

'देवा तुझा विसर पडू नये हेच मला दे. मग मी तुझे गान आवडीने गाईन हीच माझी मोठी कमाई होय. मोक्ष संपदा याची मला जरूरी नाही. सर्व काळ संतसंगती दे आणि हे जर सर्व तू देणार असशिल तर सुखाने नव्याने जन्मास घाल.

माझी एव्हडीच इच्छा आहे की, नेहमी तुझे नाव माझ्या मुखातून निघावे त्याची वृष्टी व्हावी. या छंदामुळे सुखाच्या सोहळ्याचा लाभ होईल. पाप-पुण्याहून मी निराळा होईन. तुझ्या प्रेमामुळे मागील सर्व गोष्टीचा विसर पडेल. निव्वळ तूच आठवत राहशिल. रात्रंन् दिवस तुझेच नामस्मरण मीं करीन,

कान भरोनिया ऐके तुझी किर्ती ।
ते मज विश्रांतीं देई देवा ॥ १ ॥
वाहे रंगी टाळी नाचेन उरास
हे देई हातास पायी बळ ॥ २ ॥

मूल मोठे झाले कीं आई त्याला दूर करते, त्याचा पान्हा तोडते. तू मात्र तसे करू नकोस. कारण तू कृपाळू माता आहेस. समुद्राच्या पाण्यापासून मोती होतात नंतर मात्र त्यांची भेट होत नाही. मोती एकटेच असतात तू मला तसे करू नकोस.

बीज भाजून केली लाही
आम्हा जन्ममरण नाही ॥ १ ॥

अद्यात्माचा फार मोठा विचार या अभंगात महाराज करताना दिसतात. बीज भाजून त्याची लाही होते. पण आम्हा जन्म आणि मरण नाही. आमचे परिवर्तन कोणत्या–कोणत्या रुपांत होतच असते.

मीच मला व्यालो ।
पोटा आपुलीया आलो ।।

साधू संत पुढील १०० वर्षाचे भविष्य अगोदरच सांगत असतात. मीच मला वितो. यातील अद्वैत कल्पना "अहं ब्रम्हासी" आपोआप स्पष्ट करणारी आहे.

ओल्या मातीचा भरवंसा
कां रे धरीसी माणसा ?

असा प्रश्न ज्यावेळी तुकाराम विचारू लागतो. तेव्हा भविष्यात पीकांचे प्रमाण घटेल हे सहजपणे तुकारामाने सांगितलेले आहे.

म्हणूनच विठ्ठल मी तुला हे पत्र धाडतो आहे की–

तुझा विसर न व्हावा !

आम्ही जर तुला विसरलो तर मूल आईस विसरल्यासारखे होईल. मला फक्त ऐवढेच दान दे, की तुझा विसर कधीही पडू नये.

तात्पर्याने पत्रिकेचे अभंग हे तुकारामांचे अगतिक मन पांडुरंगाकडे कसे ओढ घेत होते हे स्पष्टच करते.

माझ्या मना लागो चाळा ।
पहावया विठ्ठल डोळा ।। १ ।।
आणिक नाही चाड ।
नलगे संसार हा गोड ।। २ ।।
तरची फळ जन्मा आलो ।
सरता पांडुरंगी झाली ।। ३ ।।

'मी' 'मी' नाही. तर मी स्वतः पांडुरंग आहे. येथे अद्वैत भक्ती आहे. त्यापेक्षा 'मी' चा अंतर्तळ गांठला आहे. 'मी' विसरल्याशिवाय भक्ती होत नाही. पांडुरंग सापडत नाही. तुकाराम महाराज म्हणतात, हे सर्व खरे ! पण मी तुझ्याकडे येऊच कशाला ? मीच पांडुरंग आहे. हे तुला कळत नाही का ?

दोन प्रवृत्ती एकत्र घेऊन त्यांचे अद्वैत साधणे हे निव्वळ भक्तीमुळे शक्य होते. तुकारामाने आगदी मोजक्या शब्दात हे शक्य केले आहे.

मला तुझी भेट हवी पण ती कशी ? 'मी' मी असणार व 'तू' तू असणार या स्वरूपाची नको. जेंव्हा मन, शरीर, बुद्धी यांचे आस्तित्व संपते त्याचवेळी पांडुरंगत्व प्राप्त होते. मग राधेने श्रीकृष्णास कवळावे. एका क्षणात तिचे श्यामलपण त्याचे होते त्याचा गोरा रंग तिचा होता. भाबडी माणसे म्हणू लागतात.

श्रीकृष्ण सावळा आहे. ही त्यांची चूक असते. श्रीकृष्ण सावळा नसतोच मुळी ! सावळी असते ती राधा. त्या राधेचे सावळेपण त्याला मिळते व तो ' सावळा ' बनून जातो.

पत्रिका पाठवित असताना तूझा हाच भाव असू दे असे तुकाराम महाराज म्हणतात–

' तुका विष्णूदास संताचे पोसणे
वाक्पुष्य नेणे पाठविले

आणि यातून शेवटची विनवणी ओठी येते.

देह तुझे पायी ।
ठेवोनी झालो उतराई ।।१।।

आता माझ्या जिवा
करणें तें करी देवा ।।२।।

बहूत अपराधी ।
मतीमंद हीन बुद्धी ।।३।।

तुका म्हणे नेणे ।
भावभक्तीची लक्षणे ।।४।।

केशीराजा तू येत नाहीस. माझे मस्तक तुझ्या पायावर आहे. चित्त तुझ्या ठायी आहे, तुझ्याविना हे जग सुन्न आहे. म्हणून तरी ये. . . .

## १६) विठ्ठलाचे स्वरूप

अद्वेत भक्ती, सगुणभक्ती या वारकरी संप्रदायातील गोष्टी पाहिल्या. त्याचे सांवळे सगुण रूपडे कसे आहे ते ही प्रारंभी पाहिले आहे. अणुरेणू पेक्षा ही जो छोटा आहे. स्थूलाच्या पार आहे. तो शब्दात कसा मांडता येईल?

तुजवर्णी ऐसा तुजविणं नाही
दुजा कोणी तिन्ही त्रिभुवनीं

असे तुझे स्वरूप आहे. आम्ही तुला सगुण रुपांत पहातो. पण ते नरी खरे का ? ते ही कळत नाही. कदाचित तो आमच्या दृष्टीचा भ्रम असेल.

## १७) देवाची प्राप्ती कशी कराल ?

देव भक्ताच्या मनांत आपल्याविषयी किती प्रेम आहे, हे पाहून त्याचा स्वीकार करतो. तो दीनांचा सोयरा असल्यामुळे आपल्या भक्तास कवटाळतो. शृंगारतो. भक्ताबरोबर जेवतो. त्याचे रूसवे फुगवे काढतो. एवढेच नव्हे तर त्याच्यासाठी अवतारही धारण करतो.

गाई वळवणारा गोपाळ. तो देवास काय देतो ? त्याचा प्रेमभाव हाच देवाचे पोट भरणारा असतो. मानाचे उपचार, प्रकार देवांस लागत नाहीत. गवळ्याची ताक पिणारी पोरं पण त्यांची घोंगडी आणि त्यांच्या मनातील सद्भाव हा पांडुरंगास पुरेसा झाला.

ऐका महिमा आवडीची ।
बोरे खाय भिल्लटीची ॥१॥
थोर प्रेमाचा भुकेला ।
हाचि दुष्काळ तयाला ॥२॥
पोहे सुदाम देवाचे ।
फके मारी कोरडेच ॥३॥
न म्हणे उच्छीष्ट अथवा थोडे
तुका म्हणे भक्तीपुढे ॥४॥

भक्तीपुढे ईश्वर शरण आहे. पण ती भक्ती स्वतःला पूर्ण विसरून केली.

तर ईश्वराची प्राप्ती दूर कशी राहील ? तो तर आतूर होवून तुमची वाट पहातो आहे. तुम्ही त्या भावनेने त्याची भक्ती करा. भक्ती निर्मळ पाहिजे. हेच तुकारामास सुचवायचे आहे.

आणि असा भक्त भेटल्यावर –

बहू उताविळ भक्तीचिया काजा
होसी केशीराज मायबापा ॥ १ ॥
तुझ्या पायी मज जालासे विश्वास
म्हणूनीया आंस मोकलीली ॥ २ ॥
ऋषी मुनी सिद्ध साधक अपार
कळला विचार त्यासी तुझा ॥ ३ ॥
तुका म्हणे सुख न माये मानसी
धरिले जीवेंसी पाय तुझे ॥ ४ ॥

तू एव्हढा ओथंबून येणार असशील तर आम्ही तुझे पाय का धरणार नाही. यासाठी साधकाने भक्ती कशी करावी ? ते तुकाराम महाराज सांगतात.

भक्ती करणे म्हणजे तशी सोपी गोष्ट नाही. कुणीही उठावे गळयात माळ घालावी. म्हणावे मी वारकरी आहे. ते तुमच्याने जमणार नाही.

भक्ति तो कठीण सूळावरील पोळी
निवडे तो बळी विरळा शूर

ही सूळावरील पोळी इतरांना साधत नाही. जो साधक तो निवडतो तो निश्चित भाग्यवंत ठरतो. त्यांचे जीवनाचे संचित फलीत होते. ते पुण्यवंत ठरतात.

त्यांची वाणी देववाणी होते. पण त्यासाठी ' त्याच्या ' पायाची ' रज '– धूळ व्हायला पाहिजे.

## १८) विठ्ठलास धमकी

पत्र पाठवूनही तो भेटत नाही. मी एव्हढा काकुळतीस आलो तरी पावत नाही. हे ध्यानात आल्यावर–

अरे विठ्या काळतोंड्या
तुझे फोडीन मुस्काड

या धमकीसारखी धमकीही तुकारामाने पांडुरंगास दिली आहे.

तू निष्ठूर आहेस, तू निर्गुण आहेस. कठोर आहेस. तुझ्या या कृतघ्नपणाची किती उदाहरणे तुझ्या समोर मांडावित. राजा हरिश्चंद्राचे राज्य, घोडे घेवून तू त्याला डोंबाच्या घरी विकलेस. नळ दमयंतीचा संग बिघडून तू त्यांचा वियोग घडविलास. राजा शिबी कृपाळू व दयाळू होता. शेवटी तू त्याचे मांस काढून काढून वजन करायला लावलेस. कुरूक्षेत्रावर पडलेल्या कर्णाचे तू दान मागितलेस. तुझ्यावर प्रेम करणाऱ्या बळी राजास पाताळात घातलेस. राजा श्रीयाळ दयाळू. त्याचा पोर मारून तू मागीतलास. जे भाव ठेवून तुझी भक्ती करतात त्यांची तू अशी दैना करतोस.

तुका म्हणे दान ।
सेवा घेतल्यांवाचून ॥१॥

तू दान देतोस. पण त्यासाठी तू अगोदर त्या भक्ताकडून काही तरी घेत असतोस.

शोधसिल मूळे ।
त्याचे करसि वाटोळे ॥१॥

असा तू आहेस.

तू आम्हाला खरे तर भितोस. आम्ही तुझ्याजवळ काहीतरी मागेन म्हणून. पण तुला सांगतो, तूच विचार करून बघ ! आम्ही तुझ्याकडे काही मागत नाही. तुझ्या नावानेच तृप्त आहोत. तेच आमचे मांडवल आहे.

तू आमचा दावेदार असला पाहिजेस. म्हणूनच तू आमच्याशी बोलत नाहीस तेव्हा तू कृपाळू आहेस, मायाळू आहेस. हे सारे खोटे आहे. तू तुझे ब्रीद टाकून दे.

हे राजाचे बोलणे, ही चीड मायेतून निर्माण झाली आहे. या पाठीमागे तुकारामांचा हेतू सात्वीकच आहे. निव्वळ ही एक मायेची धमकी आहे.

## आम्ही कसे आहोत !

तुकारामाचा संवाद विठ्ठलासी आहे. एकापरीने तो स्वतःशी आहे. माझे अभंग, माझी रचना वाचक वाचतील अशी त्याची कोणतीही भूमिका नव्हती.

उठता–बसता–चालता–फिरता तो अभंग बोलत होता. आपुलाच वाद आपुल्याशी ही त्याची भूमिका होती. हा त्याचा स्वतःशी वाद म्हणजे पांडुरंगाशी वाद होता. आम्ही आहोत तरी कसे ?

मऊ मेणाहूनी आम्ही विष्णूदास ।
कठीण वज्रास भेंदू ऐसे ।। १ ।।
मेले जित असो निर्जानियां जागे ।
जो जो जे जे मागे ते ते देवू ।। २ ।।
भले तर देवू गांडीची लंगोटी ।
नाठाळाचे कांठी देवू माथा ।। ३ ।।
तुका म्हणे आम्ही अवघेची गोड ।
जया पुरे कोड त्याचे परी ।। ४ ।।

आम्ही विष्णूदास मेणाहून मऊ आहोत. पण प्रसंग पडला तर वज्रास भेदू असेही आहोत ! देह बुद्धीने आम्ही मेलेले आहोत. पण स्वरूप स्थितीवर आम्ही जागे आहोत. कोणी भक्त भेटला तर आम्ही गांडीची (आचार्य अत्रे–'कासेची') लंगोटी देवू. पण जर एखादा उर्मट भेटला तर त्याच्या माथ्यावर काठीचा तडखाही देवू. आम्ही गोडच आहोत. पण ज्याची जशी इच्छा असेल तसे आम्ही वागतो.

मी स्वतः मोहजाळामध्ये अडकले होतो. पण विठ्ठलाने मला जागे केले. त्याला दया आली. त्याने या जाळयातून मला मुक्त केले. माझ्या डोळयाना मायेचे कौतुक दाखविले. मायाम ाणसांना बिघडवते, अुडचा मारायला लावते, याचे भान दिले.

मानवी जीवनांत भौतीक सुखासाठी माणसे धडपडत असतात. विषय सुखासाठी डोळेफोड करतात. एक मेला तर दुसरा रडतो, नंतर तोही मरतो. आम्ही मात्र मरणास जिंकलेले असते. आम्ही तहान पिऊन टाकली आहे. भूक खावून टाकली आहे. दिगंबर अवस्थेतील साधूचे हात हेच त्याचे भिक्षापात्र असते.

आम्ही झुंजार वीर आहोत. यमावर हल्ला करून त्याच्या दाढा पाडू. दोषावर हल्ला करू. आम्ही आमचे काम क्रोध विठ्ठलास वाहिले आहेत. त्याच्या पायाशी आवड ठेवली आहे. आमचे देहभाव नाहीसे झाले आहेत. आम्ही रिद्धी-सिद्धीला लाथा मारल्या आहेत. ब्रह्मांडाचा ग्रास करून विठोबाचे दास झालो आहोत.

सर्वविशी आम्ही हेचि जोडी केली ।
स्वामीची साधीली चरणसेवा ।।१।।
पाहिलेची नाही मागे परतोनी ।
जिंकीला तो क्षणोक्षणी काळ ।।२।।

स्वामींची चरण सेवा करणे हे आमचे ब्रीद आहे त्यासाठी आम्ही पुढे पहात नाही. त्याचाच ध्यास आम्हास लागलेला असतो. माझे आईवडील म्हणजे विठ्ठलच आहे. व तो कृपावंत आहे.

संत जेणे व्हावे । जग बोलणे सोसावे
आता एव्हढे करा ।
ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।१।।

मुक्ताईने साधू संताची व्याख्या किती सोपी केली आहे. आपण कसे ? हे तुकारामाने सांगितले आहे.

पवित्र ते कुळ । पावन तो देश
जेथे हरीचे दास, जन्म घेती ।। १ ।।
कर्म धर्म त्यांचा झाला नारायण ।
त्याचेनी पावन तीन्ही लोक ।। २ ।।

तो देश पवित्र होय. जेथे हरिचे दास जन्म घेतात. नारायण हाच त्यांचा कर्मधर्म असतो. व तसे मानणारे आम्ही आहोत !

## २०) कीर्तनाचे महत्त्व

कीर्तन कसे करावे ? यासाठी वारकरी संप्रदायात काही नियम आढळतात कीर्तनाची जागा स्वच्छ असावी. शक्यतो व्यासपीठ नसावे. श्रोते व वक्ता एकाच बैठकीवर असावेत.

निरुपणाचे सुरवातीस गंध-अक्षता वाहून पूजा करण्याचा पहिला मान वक्त्याचा आहे. मग श्रोता जरी संन्यासी असला तरी त्याची प्रथम पूजा करू नका. मुलगा जरी राजा झाला तर त्याची आज्ञा बाप मानतो. तसे वक्त्याचे स्थान आहे.

वक्त्या आधी मान ।
गंध अक्षता पूजन ।
श्रोता यति झाला जान ।
तरी त्या नाही उचित ।। १ ।।
पद् पुत्र सांभाळी ।
पिता त्याची आज्ञा पाळी ।
प्रमाण सकळी ।
ते मर्यादा करावी ।। २ ।।

टाळांच्या घोषात नामाचा गजर करावा. त्यात ब्रम्हानंद आहे. गरूडटके, वीणा, पताकाचा भार पाहून देवानाही आनंद होतो. त्या आनंदात वैष्णव लोटांगण घालत जातात.

ते सुख पाहून पाषाणालाही पाझर फुटतो. नष्ट, खळ माणसेही आनंदीत होतात. वैकुंठास जायचे असेल तर रामकृष्ण हरी हा एकमेव मंत्र आहे.

" तुका म्हणे सोपे वैकुंठासी जातां ।
रामकृष्ण कथा हेची वाट ॥

त्याचबरोबर–

जेथे कीर्तन करावे
तेथे अन्न न सेवावे
बुका लावू नये माळा ।
माळ घालू नये गळा ॥१॥
तट्टा वृषभासी दाणा ।
तृणा मागो नये ।
तुका म्हणे द्रव्य घेती ।
देती तेही नरका जाती ॥२॥

कीर्तनाचे ठिकाणी अन्न सेवन करू नये. बुक्का लावून घेवू नये. गळयांत माळ घालू नये. बरोबरच्या जनावरास चाराही मागू नये. कीर्तनासाठी जे द्रव्य घेतात व देतात ते नरकात जातात.

कीर्तनकाराने कसे असावे हे जसे सांगितले आहे. तसे कीर्तन ऐकण्यापासूनचा लाभही सांगितला आहे. नव्या-बदलत्या युगात अशी कीर्तन विद्यापीठाची आवश्यकता नाही काय ?

## २१) पंढरी महात्म

भूतलावरील स्वर्ग म्हणजे पंढरी. साधुसंताचे विश्रांतीस्थान. जीवनाचा ठेवा सारसर्वस्व ! या क्षेत्राची महती वारकरी संप्रदायात आहे. तुकाराम महाराज पंढरपूरचे महात्म्य सांगतांना म्हणाता,

पंढरीचा महिमा ।
देता आणिक उपमा ॥१॥
ऐसा ठाव नाही कोठे ।
देव उभा उभी भेटे ॥२॥
आहेती सकळा ।
तीर्थे काळे देती फळा ॥३॥
तुका म्हणे पेठ ।
भूमीवरी हे वैकुंठ ॥४॥

पंढरी हे स्थान एव्हढे मोठे आहे की, त्याला दुसरी कोणती उपमा देणार ? त्याच्यासारखे दुसरे स्थान कुठेही आढळणार नाही. त्या विठूरायाची भेट त्या ठिकाणी उभ्याउभ्याच होते. पंढरपूरची पेठ वस्ती म्हणजे आपले वैकुंठच आहे.

वैकुंठास जाण्यासाठी खूप कष्ट करावे लागतात. ताप त्रास सहन करावा लागतो. पण हे वैकुंठ तुम्हाला सहज प्राप्त होते ? भक्त पुंडलीकाने आपणावर उपकारच केले आहेत. पंढरीची पायवाट सोपी केली आहे.

पंढरीस गेला नाही तर तुमचे जीणे व्यर्थ आहे. ज्याने पांडुरंगाचे पाय पाहिले नाहीत, त्यांचे जीणे, लाजीरवाणे होय ! तुम्ही कोटचावधी तीर्थे करा पण या सम हेच !

तुमचे स्वागत करायला पांडुरंग उभा आहे. तो तुम्हाला फसवून कधी नेईल ते सांगतां येत नाही .तुम्ही जर येथे आला तर आईवडिलांचा तुम्हास विसर पडेल. तुम्ही पांडुरंगमय व्हाल ! तुम्हाला दुःख औषधालाही मिळणार नाही. सदासर्वकाळ प्रेमाची बाजारपेठ म्हणजेच पंढरी !

धन्य ते पंढरी, धन्य भीमातीर ।
आणीयले सार पुंडलिके ॥ १ ॥
धन्य तो हा लोक अवघा दैवांचा ।
सुकाळ प्रेमाचा घरोघरी ॥ २ ॥

चंद्रभागेच्या तटी तुमचे सर्वस्व आहे. हे स्थान, भीमातीर धन्य आहे. हे तुमचे त्रैलोक्य आहे. म्हणून तुम्ही जा !

## २२) नाटाचे अभंग

नाट हा शब्द नट–नाट असा तयार झाला असावा. वास्तविक नृत्य करत नाचत गात जे अभंग म्हटले जातात, त्यांना नाटांचे अभंग म्हणतात. आषाढी, कार्तिकी वारीला वारकरी बाहेर पडतात टाळ – चिपळचा असतात. खाद्यावर भगवी पताका असते. रामकृष्ण हरी मंत्र मुखात असतो, पायांचा झपूर्झा होतो. तेव्हां कोणताही अभंग लय धरतो.

पाऊले चालती पंढरीची वाट

एवढेच माहित असते. मुखात येणारा कोणताही अभंग मग नाटाचा अभंग असतो.

परंतु तुकाराम महाराजांचे काही नाटांचे अभंग वेगळे गीतेमध्ये दाखविले आहेत. त्या अभंगाचा आपणास विचार करावा लागतो.

हे कृपानिधी मायबापा मी तर अनाथ, अपराधी, कार्यहीन गतीहीन आणि बुद्धीचा मंद आहे. आजपर्यंत मी तुला वाणीने कधीही आठवले नाही, आळवले नाही. तुझे गीत मनोभावे गायले नाही. ऐकले नाही. लोकांची लाज धरली आणि तुझ्या नामांपासून दूर राहिलो. जे लोक कीर्तन करीत होते, पुराण ऐकत होते. त्यांची निंदाच केली. मी परोपकार केला नाही, करविलाही नाही. दुसऱ्यांना पीडा

झाली तर दया आली नाही. जो करू नये तो व्यापार केला. कुटुंबास भार दिला. तीर्थयात्रा केली नाही. साधूसंतांची पुजा केली नाही. त्यांच्यावर टीकाच केली.

मी स्वतःचा घात करणारा शत्रू झालो आहे.

सर्व सुखाचिया आशा जन्म गेला ।
क्षममुक्ती यत्न नाही केला ।
हिंडता दिशा शीण पावला ।
माया वेष्टीला जीव माझ्या ॥१॥

पण आता. !

आता या मोहात, संसारजाळात मी पडणार नाही. संताना मनोभावे शरण जाईन. त्यांची सेवा करेन. त्यांच्या पायाजवळ जागा मागेन, हे विठाई, माझे संचित काय आहे. ? ते मलाच कळत नाही. म्हणून मी तुझ्या पायाजवळ जागा मागतो आहे. धाय मोकळून तुला विनंती करतो आहे.

ऐक पांडुरंगा एक गात ।
काही बोलणे आहे एकांत ।
आम्हा जरी तारील संचित ।
तरी उचित काय तुझे ॥

पांडुरंगा, मला तुझ्या बरोबर एकांतात बोलायचे आहे. आम्हाला जर संचित तारणार असेल तर तुझे काम काय ? उसने फेडले तर कोणता धर्म केला ? जर तू असे केलेस तर ते कुणाला मान्य होईल ? तू तुझा थोरपणा कशाला मिरवतोस ? एखाद्याला अन्न मिळाले नाही तर द्यावे. त्याच्यापासून आपला कोणता लाभ होईल ? असा विचार करणे बरे नव्हे ! तुझा तू विचार कर ! तुझे तू ब्रीद जाण !

झाला कंठस्फोट आळविता !
आंता न शिणवावे ?

तुझे नाम गोड आहे. त्याची आम्हाला आवड आहे. आतापर्यंत चौऱ्यांशी योनी दुःखच भोगले. पण तुझ्या नामस्मरणानेच आम्ही तारणार आहे. म्हणून मी काकुळती आलो आहे.

म्हणूनी रुसलो संसारा ।
सर्प विखार हा पांढरा ।
तुजशी अंतर रे दातारा ।
याचि दावेदारा निमित्त ॥१॥

हा संसार सर्पासारखा आहे. मी तर तुझ्यावर रुसलो आहे. या संसारामुळे तुझ्यात न माझ्यात अंतर पडले आहे. आज–

तरी म्या आळवावे कोणा ?
कोण पुरवी वासना ।
तुज वाचूनी नारायणा ।
लावी स्तना कृपावंता ।।

आता माझे सारे उपाय थकले आहेत. प्रकृती क्षीण होते आहे. गुरुची सेवा, संताची सेवा करावी हे आजपर्यंत कळलेच नाही, पोटात भूतदया नव्हती. मग ते कसे कळणार ?

म्हणून मी तुला शरण आलो आहे. मला हाती धरले आहेस ते सोडू नकोस. मी तुझाच आहे असे म्हण.

बैसता संताचे संगती
कळो आले कमळापती ।
आपुली कोणीच नव्हती ।
निश्चय चित्ती दृढ झाला ।।

आयुष्याची माझी पायवाट पोकळ झाली आहे. माझे असे कुणीच नाही. जे माझे समजत होतो ते ढोंगी आहेत.

आता मी खूप त्रासलो आहे तेव्हा भेट दे !

नाटाच्या या अभंगातून संसारातील असारता, दुःख, असाहाय्य स्थिती तुकाराम महाराजानी स्पष्ट केली आहे. म्हणूनच आर्ततेने हे अभंग भरले आहेत.

## २३) बालक्रिडेचे अभंग

पांडूरंग म्हणजे श्रीकृष्ण. त्याच्याच बालपणीच्या क्रिडा व त्यावरील अभंग म्हणजे बालक्रिडेचे अभंग ! विठ्ठलाला विविध रुपांत साधूसंतानी पाहिले. त्याची भक्ती केली. त्याची आळवणी केली. कधी तो आई झाला, तर कधी बाळरूप या बाळरूपांतूनच तयार झाली बालक्रीडेची गाणी, अभंग !

सिंधू पायवाट होय तुझ्या नामें ।
जाळी महाकर्मे दुस्तरे ती ।
ते फळ उत्तम, तुझा निधीध्यास ।
नाही गर्भवास सेलिया ।

तुझे नांव घेतले तर आगराची वाट तयार होते. ( पूर्वी यमुने ने वाट दिली होतीच ना ? ) दुस्तर, भयंकर कर्मे तुझे नाव घेताना जळून जातात. तुझा ध्यास धरला तर त्यांची फळे चांगलीच मिळतात. म्हणून श्रीकृष्णा, श्रीहरी, मुरारी आम्ही तुझी भक्ती करतो.

गोकुळातील लोकांचे तू मनोरथ पूर्ण केलेस. त्यांची वासना पूर्ण केलीस. त्यांचे ऋण फेडण्यासाठी तू अवतार घेतलास. वसुदेव–देवकी यांची मुले त्या दुराचारी

कंसाने मारली. त्याचवेळी तू त्याचा नाश केलास. वसुदेव देवकीचा पुण्यकाळ ठरलास. तुरुगांतील दारे, कुलपे आपोआप तुटली. जन्मतः आईला विश्वाचे दर्शन घडविलेस. म्हणजे तू ज्याच्या बरोबर असतोस. त्यास कुठलीही अडचण येत नाही.

चारी वेद ज्याची किर्ती वाखाणिती ।
बांधवी तो हाती गौळणीच्या ।।

चारी वेद तुझी स्तुती करतात. तू स्वतः गौळणींच्या हातून बांधून घेतला आहेस. त्यांच्या घरचे लोणी तू चोरले आहेस. खाल्ले आहेस. तू केलेली चोरी मात्र कुणालाच सांपडली नाही. तो, तू हरी जसा आत आहेस, तसाच बाहेर आहेस.

आंत हरी, बाहेर हरीं,
हरीनें घरी कोंडले ?

याचवेळी त्या गौळणी भयकुतीस आल्या. कारण त्या तुझ्या भक्त होत्या. तुझ्यावर त्यांची भक्ती होती. त्यांची भक्ती होती म्हणून तू त्यांना सापडलास. तुला मिळविण्यासाठी पैसा खर्च करावा लागत नाही. फक्त भक्ती पुरेंशी असते. त्याचवेळी तू मिळून जातोस. हे सर्व तुला माहित आहे. या गोष्टीची तू चाड धर !

चाड आणण्या धरी नारायण ।
आपणांसमान करी रंका ।। १ ।।
रंक होती राजे यमाचिये घरी ।
आचरण बरी नाही म्हण ।। २ ।।

देवावर लटके रूसणे, रागावणे, त्याची काकुळता येणे हे सर्व प्रकार गौळणीत आढळतात.

जना दिले निज सुख देवे ।
गोपिका त्या भावे अलिंगल्या ।
आलंगिल्या गोपी गुणवंता नारी ।
त्यांच्या जन्मांतरी हरि ऋणी ।
रुसलिया त्यांचे करी समाधान ।
करविता आपण क्रिया करी ।।

भक्ती करणाऱ्या या गौळणी स्वतःसच हरवल्या होत्या. घरदार–मुलेबाळे त्यांना काहीच सुचत नव्हते.

संत एकनाथानी या गौवळणींची भावदशा खूप चांगली वर्णन केली आहे. ते म्हणतात, या गौवळणी, श्रीकृष्णाच्या प्रेमात एव्हढया बुडाल्या होत्या की, दुध विकणे हे त्यांच्याने जमतच नव्हते. दुध घ्या दुध असे म्हणण्याऐवजी हरी घ्या हरी असेच त्या म्हणत होत्या. एव्हढयावर ते थांबत नाहीत. तर या गौळणी धार

काढताना हरीच्या स्मरणांत आपण गाईची धार काढतो कीं, बैलाची ? हे ही त्यांना कळत नव्हते. हरीच्या रूपांत त्या मग्न झाल्या होत्या. त्यांची मने गुंतली होती. त्यांच्या नवऱ्यांची रूपे धारण करून तो गौळणीचे भोग घेत होता.

यांच्या भ्रतारांची धरोनिया रूपे ।
त्यांच्या घरी त्याचे भोग करी ॥

असा हा चक्रधारी, लहान असताना माती खात होता. त्याची आई पहायला गेली, तर त्याने तिला विश्वाचे दर्शन घडविले.

कृष्ण आला घरा । कृष्ण गेला दारा ।
कृष्ण हा सोयरा । भेटो कृष्ण ।
कृष्ण गाता ओव्या, दळणी कांडणी ।
कृष्ण हा भोजनी पाचारती ।

ज्याच्या ओव्या गाव्या. संतत ज्याचे नाम घ्यावे. तो मात्र–

' कृष्ण हा परिचारी ।
कृष्ण हा व्यवहारी ।
कृष्ण घ्या नारी आणीखी म्हणती ।

गौळणीची ही भावावस्था किती उत्कटपणे तुकारामाने मांडीली आहे.

## २४) तुकारामाच्या गौळणी

श्रीकृष्ण हा नाटकी होता. आपल्या नादास लावून तो गौवळीना झुलवित होता. फसवित होता. त्याना प्रेमाचा ठेवा अर्पण करीत होता. प्रसंगी तो मूल होता प्रियकर होता, मित्र होता, एवढेच नव्हे तर त्यांचा नवराही होता.

संत वाङमयात एकनाथानी गौळणीस मानाचे स्थान मिळवून दिले आहे.

•' असा कसा खटचाळ तुझा कान्हा,
ग बाई तुझा कान्हा
कांही केल्या मज ऐकेना ॥धृ.॥
मध्यरात्री येतो चोरावाणी ।
त्यांची दाढी न बांधली माझी वेणी
ओढा ओढीत मोडल्या आमच्या भाना ।
ग । बाई आमच्या भाना ।
कांही केल्या मला ऐकेना ॥१॥

हा मुरारी नटखट होता ते संत एकनाथानी वरती सांगितले आंहे.

तुकाराम महाराज म्हणतात,

काय आता यासी म्हणावे लेकरू ।
जगाचा हा गुरु, मायबाप ।
माय याची यांसीं राहिली व्यापून ।
कळो नये क्षण एक होता ॥ १ ॥

असा हा थट्टेखोर, चेष्टेखोर याला लेकरु कसे म्हणावे ? हा तर जगाचा मायबाप आहे, गुरू आहे. आम्हा अडाण्यांना ते समजूनच येत नाही.

या गौळणीत त्यांच्या चेंडूचा खेळ आहे. कालीयाचे मर्दन आहे. भीतीने लोकांची उडालेली गाळण आहे, भक्ती आहे, प्रेमरस आहे, श्रृंगार आहे. सारे-सारे मोहमयी आहे.

## कांही गौळणी

१) धन्य वाचा ऐशा नारी ।
घरी दारी नांदती ॥ १ ॥
चोरूनीया तुजपाशी ।
येतो त्यासी न कळता ॥ २ ॥
दोन्ही ठाया समाधान ।
सम कठीण बहुतांसी ॥ ३ ॥
तुका म्हणे जिवांसाठी ।
दुर्लभ भेटी ते देवा ।

२) आलिंगन कंठाकंठी ।
पडे मीठी सर्वांगी ॥ १ ॥
न घडे मागे परते मन ।
नारायण संभोगी ॥ २ ॥
वचनासी वचन मिळे ।
विघती डोळे डोळीयात ॥३ ॥
तुका म्हणे अंतर्ध्यानी ।
जीव जीवनी विराल्या ॥ ४ ॥

३) बाळो जन ऋणोत शिंदली ।
परी हा वनमाळी न विसंबे ॥ १ ॥
सांडूनी लौकीक झालीये उदास ।
नाही भय आंस जीवित्वाची ॥२॥
नाईकें वचन, बोलता या लोकां ।
म्हणे झाले तुका हरिरता ॥३॥

क्षणभर आम्ही वाईट सोसले असेल पण स्वर्गसुख भोगले आहे. त्यामुळे आम्ही आता वडील, धाकडे सर्व काही झाले आहोत. आता त्याच्याबरोबर आम्ही हंसू, रुसू कारण तो आमच्या अंतरीची गोडी आहे.

४) या हो या चला जावू सकळ ।
पाहो हा सोहळा आजि वृंदावनीचा ।।१।।
वाईला गोपाळे वेणुनाद पडे कानी ।
स्थीर नव्हे मनी चित्त झाले चंचळ ।।२।।
उरले ते सांडा, काम नका गोवी ।
हीच वेळ मज ठावी श्रीकृष्ण भेटी ।।३।।

गोपीना त्याच्या दर्शनामुळे आत्मसुख मिळत होते. त्या एकमेकीना आपला हा अनुभव सांगत होत्या. पण तो अनुभव प्रत्येकीने भोगला होता. तो तर चोरून प्रत्येकीस भेटत होता. भोग देत होता. तो चतुरमाद होता.

या गौळणीत श्रीकृष्ण एक दीव्यत्व धारण करून पुढे येत नाही. तो त्याचा सहजस्वभाव आहे. भक्तासाठी देवांचे ते सहज वागणे आहे म्हणून ते अलौकीक आहे.

(स्थळ प्रत)

## प्रकरण : दहा

## अभंगातील विविधता

मानवाचे जीवन विविधतेने नटलेले आहे. इंद्रधनुष्याचें रंग या विविधतेत आहेत. कधी त्यात आभाळ डोकावते, तर कधी निळेशार पाणी. कधी विश्वाची अथांगता तर कधी सागराची गंभीरता. या साऱ्यातून जन्म घेते एक देखणे भावरूप! भावजीवन! या भावविश्वाशी खेळ करतो तो कवी! तुकाराम एक असाच कवि होता की ज्याचे सारे आयुष्यच एक कविता होते. एक भावगीत होते.

अष्टसाप्तीक भावनांचा तो शोध घेत होता. वेगवेगळ्या स्तरावर, वेगवेगळ्या पातळ्यावर. यातून साकारत होती त्याची विविध व्यक्तीमत्वे?

कधी तो क्षणयिनी बनून श्रीकृष्णास आळवित होता. प्रौढ गृहस्थी बनून उपदेश करीत होता. आई होऊन कुर्वाळीत होता. संत बनून नाचत होता. व्यक्तीत्व एक पण अनेक घुमारे त्यात पडले होते स्पष्ट दिसत होते. यातील विविधता हीच त्याच्या भावकवितेची बीजे होती.

### १) कोडे– एक गणित!

कोल्हापूरी भागात 'हुमान घालणे' असा ग्रामीण शब्दप्रयोग आहे. त्यातूनच उखाणा जन्मास आला. हा उखाणा कोडे बनला. असेच एक कोडे तुकाराम घालतो आहे.

'कोडे रे कोडे ऐका रे कोडे।
उगवूनी फार राहे गुंतोनिया थोडे ।।१।।
पुसतसे सांगा मी हे माझे ऐसे काई
रूसू नका नुगवें तो झवे आपुली आई ।।२।।

सांगतो हे मूळ कांही न धरावी खंती
झाले जीनों, मेले मरो, प्रारब्धा हाती ॥३॥

तुका म्हणे अभिमान सांडावा सकळी
नये अंगावरी वाया येवू देवू कळी ॥४॥

मी तुम्हास हे एक कोडे घातले आहे. ते सुटते का पहा. यात जे गुंतले असतील ते मातेशी व्यभिचार करतील. मी मूळची गोष्ट सांगतो. त्याची खंत मनात बाळगू नका. जीव जगो किंवा मरो हे प्रारब्धाच्या हाती आहे. म्हणून महाराज म्हणतात, सर्व अभिमान टाकून द्या. आपल्या अंगावर काही येवू देवू नका !

## २) जोहार–

जोहार म्हटले म्हणजे चोखामेळा आठवतो. मी तो तुमच्या दारीचा महार म्हणणारा. तुकारामानेही असे जोहार घातले आहेत. स्वतः वेसकर बनून ! आता माझा फेरा तुम्हास चुकविता येणार नाही. तुम्ही माझे देणे चुकते करा. तुम्ही खोड्यात अडकला !

जोहार जी मायबाप जोहार ।
सारा साधावया आलो वेसकर ॥१॥

मागील पुढील करा झाडा ।
नाही तरी खोडा घालती जी ॥२॥

## ३) शेतामध्ये विठोबा !

मूळा कोथंबिर भाजी । आवघी विठाई झाली माझी ॥

असे सावंतामाळ्याने म्हणून भक्तीचा मळा फुलविला आहे. तुकारामही त्यातला एक शेतकरीच. तो म्हणणो–

सेत करारे फुकाचे ।
नाम विठोबारायाचे ॥१॥
नाही वेठी जेवा सारा ।
जा हाती नाही म्हणिचारा ॥२॥
प्रेम पिकले अपार ।
नाही सांठवावया थार ॥३॥

हा भक्तीचा मळा आहे. विठोबाच्या प्रेमाचे पीक अपार पिकले आहे. ते तुम्ही लुटा घटीका, पळे त्यासाठी वाया घालवू नका. तुम्ही या भक्तीच्या मळ्यातील माळी आहात ! भक्तीचे हे पीक सदासर्वकाळ येते याचे मात्र भान असू द्या !

## ४) शकुन !

मी तुम्हाला टाकून (सरवदा) सांगणार आहे. या संसारातून तुम्ही मुक्त व्हा ! काम क्रोध यांचा त्याग करा. शहाणा माणूस एकाचा त्याग करतो व दुसऱ्याचा स्वीकार करतो. देह खरा नाही असे जो तुम्हांस सांगेल तो नरकांत जाईल ! त्याची अधोगती होईल. मी सांगतो आहे म्हणून या शकूनावर विश्वास ठेवू नका. तो चारचौघांकडून पारखून घ्या. देह खोटा आहे. त्यावरील प्रेम सोडा. सगळी दु:खे आपोआप नाहीशी होतील !

ऐका या ए माई ।
सरवदा सांगतो काही ।। १ ।।
येथे नाडेल भाई ।
दोघा पुत्रांची ।
आणिक नाडेल एक जाण ।
सरवदा बोलतो वचन ।
जागे माझे चित्त म्हणोन ।
पडीले खान तयाघरी ।
म्हणोनी न म्हणा ।। माझे काही तरी ।।

साधू–सन्याशी कवी पुढील ५० वर्षांचे सत्य अगोदर सांगत नाहीत काय ?

## ५) गोंधळ !

राजस सुंदर बाळा ।
पाहो आलिया सकळा हो ।
बिंबी बिंबोनी ठेली ।
माझी परब्रह्म वेल्हाळा हो ।
कोटि रविशशी जिच्या–
आंगिचिया वेल्हाळा हो ।। १ ।।

गोंधळ घालताना सर्व देव देवतांना पाचारण करावे लागते. त्यांची उपस्थिती गोंधळात फार महत्त्वाची असते. तुकारामांचा हा गोंधळ विठ्ठलाचा आहे.

राजस विठाबाई । माझे ध्यान तुझे पायी हो । असे या गोंधळाचे स्वरूप आहे. हे परम–वेल्हाळा तू ये. तुझ्या अंगात कोटी चंद्रसूर्यांच्या लीला आहेत. त्याकडे माझे ध्यान लागो ।

माझ्या अंगी देवी खेळते पण ती विठ्ठाई आहे. सुखदु:खाची म्हणून मला आठवण होत नाही. तुम्हीही तुमच्या मनाचा विचार करा. या गोंधळात सामील व्हा !

## ६) हिंदी पद

क्या गाऊं कोई सुननेवाला ।
देख तो सब जग ही भुला ॥ १ ॥
खेलों आपनें रामही सात ।
जैसी वैसी कर हो मात ॥ २ ॥
कहाँसे लावू मधूर बानी ।
रीझे ऐसी लोक बिराणी ॥ ३ ॥
गिरीधर लाल तो भाव का भुका ।
राग कला नहि जानत तुका ॥ ४ ॥

अशी दूर पदे आपणास आढळतात.

## ७) कलियुगाचे भविष्य

या कलियुगात पहा खोटयाचे मागे सर्व लोक लागले आहेत.त्याना या खोटयाची एक प्रकारची गुंगीच चढली आहे. त्याना पाप आवडते.ते संताची हेटाळणी करतात. अधर्माच्या बळाने सर्व लोक भुलले आहेत. धर्माचे मूळ नष्ट होत आहे. अप्रलय काळासच सुरवात झाली.

ब्राह्मण ब्राह्मण्य टाकून पीरास भजत आहेत. चांगल्या अर्थाचा अनर्थ झाला आहे. परमार्थ–नीती बुडाली आहे. भलतेच लोक पुढे येत आहेत.

पहा हो कलिचे ग्रहमान ।
असत्यासी रिझले मन ।
पाप देती अनुमोदन ।
करिता हेळण संताचे ॥ १ ॥
ऐसे अधर्माचे बळ ।
लोक झकविले सकळ ।
केले धर्माचे निर्मूळ ।
प्रलयकाळ आरंभिला ॥ २ ॥

## ८) खळ-दुष्ट-गाढव-एक ! !

एक जहाँबाज स्त्री चांगली धडधाकट असून आपण आजारी असल्याचे आपल्या नवऱ्यास सांगते. तिचा मूर्ख नवरा तिच्यावर प्रेमाने वेडा झाला आहे. ती म्हणते, माझी पोटाची व्यथा आहे. तेव्हा दुधभात साखरभात मला द्या. अंगाखाली मी फुल अंथरते पण दुपारी झोपच येत नाही.

मला मुलांची किरकिर सहन होत नाही. कपाळ दुखते म्हणून मी चंदनाचा लेप लावते. मला जेवण जात नाही म्हणून पायलीचा गव्हाचा सांजा खाते. मागच्या

वेळी तुम्ही दहा किलो साखर आणली ती सात दिवसातच संपली. माझी हाडे गळून पडली आहेत. त्यावर मांसच चढले आहे. एवढे माझे दुःख तुम्हास कसे समजत नाही.

म्हणून तुकाराम महाराज म्हणतात. या बाईने जिवंत नवऱ्यास गाढव केले आहे. व तो ' होय बा ' नुसता गाढवच आहे.

महारासी शिवे ।
कोपे ब्राम्हण तो नोहे ।
तया प्रायश्चित्त कांही ।
देहत्याग करीता नाही ।। १ ।।

महाराचा स्पर्श झाला म्हणून जो कोपतो तो कसला ब्राह्मण? त्याने आत्महत्या करावी.

माणसात एक गाढवपण लपलेले असते. ते त्यास माहित नसते. कुणीतरी ते उघडे केले पाहिजे. असे हे गाढवपण तुकाराम महाराज उघडे करतात.

द्रव्य असता धर्म न करी ।
नागवला राजद्वारी ।।
माय त्यासी व्याली जेव्हा ।
रांड सटवी नव्हती तेव्हा !

धर्म करणे हे पुण्यवंताचे काम असते. पैसे असताना जो धर्म करीत नाही त्याचा जन्म व्यर्थ होय.

जातीची शिंदळ ।
तिला कोण कैसा वळी ।
आपघर ना बाप घर ।
चिंती मनी व्यभिचार ।।१।।
सेजे असोनिया धनी ।
परद्वार मना आणी ।
तुका म्हणे असल जाती ।
जातीसाठी खाती माती ।।२।।

जी जात्याच शिंदळ आहे, तिला कोण कसा वळवू शकेल ? आपल्या घरी असो की, बापाच्या घरी असो, तिच्या मनात नेहमी पापाचा विचार चाललेला असतो. अंथरुणावर नवरा जवळ असताना तिच्या मनांत परपुरुषाचा विचार असतो, पण जी अस्सल जातीची असते, ती जातीसाठी माती खाते, कारण ती पतिव्रता असते, खरा संत हा पतिव्रतेसारखा असतो.

## ९) कांही ग्राम्यता

तुकारामाच्या अभंगात आश्लिलता नाही, अश्लीलता हा पहाणाऱ्याच्या नजरेचा दोष असतो. परंतु ग्राम्यता मात्र जरूर आढळते. ही ग्राम्यता त्याला दिलेल्या त्रासांतून जन्मास आली आहे.

नपुसंक, रांड, काय ऐसा पुत्र प्रसवली !

किंवा

झंवली महारे । त्यासी व्याली ऐसी पोरे

किंवा

भले तर देवू गांडीची लंगोटी–

असे काही ग्राम्य शब्द येतात. त्या काळाशी विचार करता यातील ग्राम्यपण आजही जाणवू नये असे वाटते.

## १०) एक भारूड–

मराठी भाषेत भारूडांची रचना संत ज्ञानेश्वरांपासून आपणांस आढळते. ‘ काटयाकुटचाच्या आणीवर होती तीन गांव ’ हे त्यांचे अध्यात्मीक भारूड प्रसिद्ध आहे. तेच भारूड हा वाङमय प्रकार मात्र संत एकनाथांच्यापासून पुढाराला गेला. असेच एका संसारी स्त्राचे चित्र, जी संसार सोडू शकत नाही. या भारूडात मिळते.

आवा चालली पंढरपूरा ।
वेशीपासूनी आली घरा ।।१।।
परिस गे सूनबाई ।
नको वेचू दुध दही ।।२।।
ऐके गोष्टी सादर बाळे ।
करी जतन फुटके पाळे ।।३।।
भिक्षुक आल्या घरा ।
सांग गेली पंढरपूरा ।।४।।
सून म्हणे बहूत निके ।
तुम्ही याचेसी जावे सुखे ।।५।।
आता कासचा याचे जावू ?
काय जावोनी तेथे पाहू ? ।।६।।
लेकरे घरदार ।
तेच माझे पंढरपूर ।।७।।
तुका म्हणे ऐसे जन ।
गोवियले मायेकरून ।।८।।

संसार सोडू न शकणाऱ्या एका स्त्रीचे रूप या भारूडात आपणांस आढळते. संसार म्हणजे माया ! ती माणूस सोडू शकत नाही. त्याचे हे बोलके उदाहरण नाही काय ? अशीच काही त्यांची भारूडे आडळतात.

## ११) विषयासक्त मने

वारकरी संप्रदायात काही नित्य नियम आहेत. कोणती वारी करावी. आचरण कसे असावे ? याविषयी तुकारामाने मार्गदर्शन केले आहे.

' पापाची वासना नको दावू डोळा
त्याहूनी आंधळा बरा मी ।
निंदेचे श्रवण नको माझ्या कानी ।
बधीर करोनी ठेवी देवा ।

पापाची वासना माझ्या डोळ्यांना दाखवू नकोस. त्यापेक्षा आंधळा झालो तरी चालेल. दुसऱ्याची निंदा करणे व ऐकणे हेही माझ्याकडून घडून देवू नको. त्यापेक्षा मी बहिरा परवडेन !

जे एकादस करीत नाहीत ते
' जया नाही नेम एकादशीव्रत ।
जाणावे ते प्रेत सर्व लोकी ।। १ ।।
जयाचिये द्वारी नाही तुळशीवृंदावन
नाही ते स्मशान गृहजाण ।। २ ।।
विठोबाचे नाव न उच्चारी जे तोंड ।
प्रत्यक्ष ते कुंड चर्मकाचे ।। ३ ।।
काही नित्यनेमाविण ।
अन्न खाई तो श्वान ।। ४ ।।

## १२) दांभीक संत

तुकारामाचें वेळी दांभीक संत, कीर्तनकार फार होते. त्यांची अवस्था कोड फुटलेल्या माणसासारखी होती. धड ते काळे नव्हते किंवा गोरेंही नव्हते. त्या संदर्भात ते म्हणतात.

ऐसे संत झाले कळी । तोंडी तमाकूची नळी।
नेसोनी कासोटा । वाढवोनी जटा ।
अभिमान मोठा । आणताती ।।

भगवे वस्त्र धारण करून समाजास लुबाडणाऱ्यांची वरीलप्रमाणे टिंगल केली आहे. वांझ स्त्रीने पोटावर फडकी बांधून गरोदर रहावे तसे खोटे तत्वज्ञ असतात.

## १३) पापी माणूस–

पापी माणूस कोण ? याचेही विवरण तुकारामाने केले आहे. ब्रह्महत्या, गोहत्या, गुरुहत्या, करणारा महापापी असतो. ज्याने आपल्या कन्येचा विक्रय केला तो कुत्र्यासारखा पिसळणारा माणूस होय ! ज्याने भाड खाल्ली त्यांने नरमास भक्षण करण्यासारखेच आहे. जो मुलगी विकतो त्याने सर्वच पापे केली आहेत. त्याचे नाव घेताना वाणीला कंप सुटतो. असे व्यवहार करण्यापेक्षा तो हरामखोर व ती रांड भीक का मागत नाही ?

ब्रह्महत्या मारील्या गाई ।
आणिक काही पाप केले ।।१।।
ऐका जेणे विकली कन्या ।
पवाडे त्या सुन्याचे ।।२।।
नरमांस खारली भाडी ।
हाका मारी म्हणोनी ।।३।।
अवघे पाप केले तेणे ।
जेणे सोने अभिलाषले ।।४।।
तुका म्हणे कोराला रांड ।
बेटा भांड मागेना का ? ।।५।।

रडून दुसऱ्याकडून मान मागण्यात काय मोठा पराक्रम आहे. ? देवाने मान दिला तर त्यात गोडी असते. शेतात पिकवलेले धान्य व भीक मागून आणलेले धान्य यातून कोणते अन्नदान तुम्ही करणार ?

पापी माणसं या गोष्टीचा विचारच करत नाहीत. अशी चपराक महाराज मारतात.

## १४) मनाला उपदेश

समर्थ रामदासांनी मनाचे श्लोक लिहिले आहेत. स्वतःच्या मनाला उपदेश केला आहे. तुकारामांच्या रचनेतही असा उपदेश आपणास आढळतो.

अधिरा माझ्या मना ऐक मात ।
तू का रे निश्चित निरंतर ?

माझ्या मनां तू का रे काळजीत असतोस ? काय खावे ? काय प्यावे ? या विचारात राहतोस. तुझ्यापेक्षा पक्षी कितीतरी चांगले. ते कधी विचार करतात की ते कधी संचय करतात की ?

होवू नको काही मना या अधिन ।
नाईके वचन यांचे कांही ।। १ ।।

हरीयांची गोष्ट मोडून टाकावी ।
सोई ही धरावी विठोबाची ॥ २ ॥
आपुले आधीन करूनिया ठेवा ।
नाही तरी जीवा घातक हे ॥ ३ ॥
तुका म्हणे झाले जे मना आधीन ।
तयासी बंधन करी ॥ ४ ॥

हे मना, तू यमांच्याही आधीन होवू नकोस, तू हट्ट करशील तो करू नकोस. मनाल्या आपल्या आधीन ठेवणे यातच सामर्थ्य आहे.

## प्रकरण : अकरा

---

## भावकवी तुकाराम

तुकारामाच्या एकूण रचनेचा आढावा विविध अंगाने घेतला. त्याच्या चरित्रापेक्षा त्याची रचना हे त्याचे जीवन अधिक स्पष्ट करणारी आहे. प्रत्येक साधकांस त्याच्या अध्यात्मिक आयुष्यात ज्या यातना, शंका-कुशंका भोगाव्या लागतात, त्याच्या अंतःकरणास जी हुरहूर लागते. त्या सर्व अवस्था तुकारामांस भोगाव्या लागल्या. तुकारामाच्या मनात असणारी ईश्वरविषयक तळमळ, त्यातील उत्कटता इतर संताच्या रचनेत फारशी आढळत नाही. तुकाराम एक सामान्य माणूस ! त्याचा प्रवास सामान्य माणूस ते विठ्ठलमय असा झाला आहे.

तुकाराम म्हणजे आपल्या दृष्टीस जमवून घेता येईल असा संथ प्रकाश होय. त्यात गांभीर्य आहे, तेजस्विता आहे, पण प्रखरपणा नाही. आपणास हवा तेवढाच प्रकाश आपण त्याच्यापासून स्वीकारू शकतो. हेच इतर संतापेक्षा त्याचे वेगळेपण आहे.

भक्तीयोग ही तुकारामाची जीवननिष्ठा होती. स्वतःला विसरून, प्रपंच विसरून तो अखंड वहावत गेला पाण्याच्या प्रवाहाबरोबर एखादा कण वहात जातो, त्याला स्वतःचे अस्तित्व असते. पण तो पुरता त्या प्रवाहाचा असतो. तुकारामाचे असे झाले आहे. त्याची कविता, त्याच्या जीवनातून वेगळी काढताच येत नाही.

एकाकी अवस्थेत तो ईश्वरनामाचा महिमा गातो. तो गात असताना स्थळ-काळ याचे भान त्याला रहात नाही.लहान पोर आईजवळ हट्ट धरून बसते तसे तो देवापाशी हट्ट धरून बसला आहे. आपल्या अडाणी वाणीने सहज बोल बोलतो आहे.

नारायणाचा अखंड जप त्याने मांडला आहे. मुखी नाम हाती मोक्ष अशी साक्ष तो देत आहे.

त्याचे जीवनही तसे साधे सरळ नाही. काटचाकुटचांची वाट त्याच्याही पदरी आली आहे. रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग असे वारंवार प्रसंग त्याच्या आयुष्यात आले आहेत. तो डगमगत नाही. हरीकृपेने आपण हे सर्व टाळणार यावर त्याचा विश्वास आहे. देवाने तो विश्वास सार्थ ठरविला आहे.

समता आणि सदयता हे भक्तीचे मर्म असते. तुकारामाने ते पूर्णपणे जाणले होते. हे तो कोळून प्याला होता. भक्ती आणि नीती, त्याग आणि भोग या गोष्टी त्याला आकलल्या होत्या. भक्ताची भोळी भक्ती देवाला आवडते हे नामदेवाचे तत्वज्ञान त्याच्या अंगी बाणले होते.

आत्मनिरीक्षण परीक्षण करुन भक्तीचा मार्ग सोपा करना येतो यावर त्याचा विश्वास होता. देव दयाळू आहे फक्त तो भक्तार्ची परीक्षा घेतो हे त्याला ज्ञात होते. भक्ती असेल तर पांडीत्य येते. म्हणूनच नंतर तो पंडित झाला.

मरण ह्रा देहाचा धर्म आहे. जन्मास येणारा प्रत्येकजण मरणारा असतो. या देहाचे सोने व्हायचे असेल तर भक्तीमार्ग स्वींकारला पाहिजे. भक्तीचे पीठ त्यासाठी खुले आहे. देवाकडे मोक्षाचे गाठोडे नाही. सात्वीक भक्ती माणसाला तिथपर्यंत घेवून जावू शकते. यासाठी भक्तीरूप व्हा !

वयाची ४१ वर्षे हा संप्रदायाचा कळस आपल्या भक्तीने तेजाळत राहिला तो गात राहिला. मराठी भाषेतला पहिला भावकवी ठरला.

आता मात्र त्यांना जाणीव झाली. आपले येथील काम संपले आहे. उराउरी भेटी झाल्या.

आम्ही जातो तुम्ही कृपा असो द्यावी ।
सकळा सांगावी विनंती माझी ।।१।।
वाढवेळ जाला, उभा पांडुरंग ।
वैकुंठा श्रीरंग बोलावितो ।।२।।
अंतकाळी विठो आम्हासी पावला ।
कुडीसहीत जाला गुप्त तुका

आणि तुकोबाचे सदेह वैकुंठ गमन झाले.



शाखा
३२८४

# परिशिष्ट

## संदर्भ ग्रंथ


| | |
|---|---|
| १) तुकारामाची गाथा– | स. के. नेऊरगांवकर. |
| २) संतश्रेष्ठ श्रीतुकाराम– | गुरुदेव रानडे. |
| ३) तुकाराम चरित्र– | पु. म. लाड. |
| ४) पाच संत कवी– | शं. गो. तुळपळे. |
| ५) पाच संप्रदाय– | पं. रा. गोसावी. |
| ६) महाराष्ट्र सारस्वत– | वि. ल. भावे, डॉ. शं. गो. तुळपुळे. |
| ७) तुकाराम चरित्र– | परळकर. |


REFBK-0025772

## दोन शब्द !

अंधाऱ्या खोलीत नसणाऱ्या माणसांला शोधण्याचा प्रयत्न आजची तरुण पिढी करत आहे. एका अंधाऱ्या खोलीत एक आंधळी बसून होती. एक तरुण गडबडीने आंत आला आणि म्हणाला, 'काय ग, अंधारात काय बसून राहिलीस ? दिवा लावायचा नाही कां?'

आंधळीस त्या प्रकाशाचा काय उपयोग ? आजची तरुण पिढी ही अशी नसणाऱ्या माणसाना शोधणारी ! आमची भौतिक प्रगती झाली पण नैतिक अधोगती झाली आहे. माणूस चंद्रावर पोहोचला, मंगळाचा शोध घेवू लागला. उद्या तो शुक्रावर वस्ती करेल पण त्याच्यातील माणूसपण हरवलेलं असेल ! त्याचे पाय मातीचे असण्याऐवजी प्लॅस्टीकचे असतील ! म्हणून ----

आमचे साधुसंत, आणि त्यांचे वाङमय, त्यांची रचना आपणांस अवघड वाटू लागली आहे. जे संत आमच्या देवघरात असायला हवेत ते उपरे बनून भिंतीवर टांगले जात आहेत. त्यांच्या वाडमयाचा, त्यांचा नव्या दृष्टीने शोध घेणे आवश्यक वाटते. म्हणून केलेला हा एक प्रयत्न ----!!